## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com


# दैनिक जनता आवाज







अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ५२ | गुरुवार, दि. ०३ एप्रिल २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### मुलानेच केला वडिलांचा खून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बदलापूर :** बदलापूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. मुलानेच वडिलांचा खून केल्याचे वृत्त समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. गप्पा मारता मारताच मुलाने वडिलांच्या पोटात धारदार शस्त्राने वार केल्याची माहिती समोर आली आहे. अनंत कराळे असे हत्या झालेल्या वडिलांचे नाव असून आरोपी मुलगा गणेश कराळेला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### नमाजीवर जीवघेणा हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** रमजान ईदच्या दिवशी रात्री नमाज पठाण करून घरी निघालेल्या एकाला रस्त्यात आडवून चाकुने पोटात भोकसून खुनाचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सलिम शेख आणि अमिर शेख (दोघेही रा. मार्कडेयनगर, वैदवाडी हडपसर ) या आरोपीच्यावर वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आवेज फिरोज शेख (२३, रा. मार्कडेयनगर, वैद्यावाडी, हडपसर) यांनी फिर्याद दिली आहे.

### १०४ कामगारांची केली फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वानवडी :** पुण्यात एका धक्कादायक प्रकरणाचा पर्दाफाश झाला आहे. प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या कंपनीच्या नावे १०४ कामगारांची फसवणूक करण्यात आली. श्री गणेश एंटरप्रायजेसचे मालक सीताराम ठकाणसिंग यांच्याविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मादी बछड्याला झाला अर्धांगवायू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नागपूर :** यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन वनपरिक्षेत्रात एक वाघिण गंभीर स्थितीत आढळून आल. टी-९ वाघिणीच्या मादी बछड्याला अर्धांगवायू झाल्याचे निदान करण्यात आले आहे. भेंडाळा नियतक्षेत्र कक्ष क्रमांक २० (ब) मधील सावळी रोपवनात मंगळवारी ही वाघीण सापडली. तिच्या मागच्या पायाला गंभीर दुखापत झाली होती.




# वक्फ संशोधन विधेयकावरून वादळ?

## वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत चर्चा

जनता आवाज वृत्तसेवा

**नवी दिल्ली : अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ सादर केले. रिजिजू यांनी याला उम्मीद (युनिफाइड वक्फ मॅनेजमेंट एम्पॉवरमेंट, एफिशियन्सी अँड डेव्हलपमेंट) असे नाव दिले आहे. या विधेयकाला केंद्र सरकारचा भाग असलेल्या टीडीपी, जेडीयू आणि एलजेपी यांनी पाठिंबा दिला. शिवसेना यूबीटी खासदार अरविंद सावंत यांनी त्यांच्या भाषणात हे स्पष्ट केले नाही की ते विधेयकाच्या बाजूने आहेत की विरोधात आहेत.**




विधेयकावरील चर्चेदरम्यान रिजिजू यांनी ५८ मिनिटे भाषण दिले. ते म्हणाले की, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने ५ मार्च २०१४ रोजी १२३ प्रमुख मालमत्ता दिल्ली वक्फ बोर्डाला हस्तांतरित केल्या होत्या. लोकसभा निवडणुकीच्या अगदी आधी अल्पसंख्याक मतांसाठी हे करण्यात आले होते, परंतु निवडणुकीत पराभव झाला.

रिजिजू म्हणाले की, जर आपण आज हे दुरुस्ती विधेयक सादर केले नसते, तर आपण ज्या इमारतीत बसलो आहोत ती इमारतदेखील वक्फ मालमत्ता असल्याचा दावा करू शकली असती. जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेत आले नसते तर इतर अनेक मालमत्तादेखील अधिसूचित झाल्या असत्या.

ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने या विधेयकावर तीव्र आक्षेप व्यक्त केला आहे. एआयएमपीएलबीचे प्रवक्ते डॉ. सय्यद कासिम रसूल इलियास यांनी या विधेयकाचा निषेध केला आणि म्हणाले, पान ४

> वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर महाराष्ट्र सरकार मोठा निर्णय घेण्याची तयारी करत आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर वक्फ बोर्डाच्या माध्यमातून हिंदू शेतकरी आणि हिंदू देवस्थानच्या ज्या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या आहेत, त्या परत करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे.
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

### विरोधकांचा आक्षेप काय?

विरोधी पक्षांनी विधेयकावर आक्षेप घेतला असून चर्चेचा वेळ १२ तासांपर्यंत वाढवण्याची मागणी केली आहे. तमिळनाडूतील एआयएडीएमके, नवीन पटनायक यांची बीजू जनता दल आणि के. चंद्रशेखर राव यांची भारत राष्ट्र समिती यांनीही विरोधकांच्या बाजूने भूमिका घेतली आहे.

### कोणत्या पक्षांनी विधेयकाला पाठिंबा दिला?

चंद्रबाबू नायडू यांच्या तेलुगु देशम पार्टी (टीडीपी) आणि नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड (जेडीयू) यांनी विधेयकाला समर्थन दिले आहे.

> विधेयकातील तरतुदी धोकादायक आहे. त्यांनी या विधेयकामुळे १.२ लाख कोटी रुपयांची जमीन सरकारकडे जाण्याची शक्यता वर्तविली. आज आपण गप्प बसलो तर उद्यापासून एक एक समाज संपवला जाईल. सत्तेला नव्हे तर समाजाला मी उत्तरदाई आहे. विधेयकात अनेक मुद्दे चिंताजनक वाटत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचं नाव राज्यातील सरकारने घेतलं, मात्र सत्ता घेतल्यावर ते विसरले. छत्रपती शिवाजी महाराज समाज, धर्म, पंथ न पाहता सगळ्यांना सोबत घेतलं. छत्रपती शिवजी महाराज यांनी सगळ्या धर्माला सन्मान दिला. या विधेयकामुळे अनेक अधिकार सरकारकडे जातील. १.२ लाख कोटी रुपयांची जमीन सरकारकडे जाईल. वक्फ बोर्डाच्या अधिकारात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करावा,
>
> **- निलेश लंके, खासदार**

### अल्पसंख्याक मोर्चाच्या सदस्यांचा जल्लोष

लोकसभेत वक्फ सुधारणा विधेयक २०२५ सादर होताच मुंबईतील मुस्लिम समाजात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. विशेषतः मुंबईतील बोरीवली परिसरात भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या सदस्यांनी जल्लोष साजरा करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले.

# विवाहितेची आत्महत्या

## पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** माहेरून पैसे आणावेत म्हणून वारंवार मानसिक, शारिरीक त्रास देत मारहाण करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी लोणी बुद्रुक येथील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.



अहिल्यानगर जिल्ह्यातील लोणी बुद्रुक येथील बाळासाहेब नगरमध्ये राहणारी काजल दीपक कोहकडे हिने राहात्या घरात अंगावर ज्वलनशील पदार्थ टाकून पेटवून घेत आत्महत्या केली. तिला प्रवरा रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तिची आई पार्वती राम गिरी यांनी लोणी पोलिसात तक्रार दिली असून, आरोपी दीपक भीमराज कोहकडे (पती), नंदा भीमराज कोहकडे (सासू), किशोर भीमराज कोहकडे (दिर) व आरती किशोर कोहकडे (जाऊ) यांचा समावेश आहे.

पती दीपक व दिर किशोर यांना पोलिसांनी अटक केली आहे.

### मध्य महाराष्ट्र, मराठवाडासह विदर्भाला ऑरेंज अलर्ट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दहिवेल पिंपळनेर दुपारी २:४५ दरम्यान अवकाळी पावसासह गारपीट झाली. या गारपिटीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. सकाळपासूनच वातावरणामध्ये उकाडा जाणवत होता, परंतु अवकाळी पावसाने काहीसा गारवा निर्माण केला आहे. मात्र तुरळक प्रमाणामध्ये गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी गहू कापून शेतात ठेवला होता. त्याचे देखील नुकसान झाल्याचे बोलले जात आहे. अर्धा तास झालेला पावसाने शेतकऱ्यांचा तोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे.

# ...सर्व गँगला सुतासारखे सरळ करणार

## उपमुख्यमंत्री पवारांचा इशारा; बीडमध्ये राष्ट्रवादीचा युवा संवाद कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड :** आपल्या जिल्ह्यात राख, वाळू, भूमाफिया अशा गँग वाढल्या आहेत. पण या सगळ्या गँगला आता सुतासारखं सरळ करायचे आहे. त्याला आता पर्याय नाही, असा इशाराही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी दिला आहे.



आपल्याला संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे सुसंस्कृत राजकारण पुढे घेऊन जायचं आहे. त्यांचे बेरजेचे राजकारण पुढे घेऊन जायचे आहे. पण हे बेरजेचे राजकारण करत असताना मला पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना सांगायचंय की, पक्षात एखाद्याला घेताना त्याचे रेकॉर्ड तपासून पक्षात घ्या. मी काल रात्री बीडच्या दौऱ्यावर येण्याआधी इथल्या एसपींकडून आज माझ्या दौऱ्यात जे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत, त्यांचे रेकॉर्ड मागवून घेतले. आपण लोकांना काही गोष्टी सांगत असताना आपल्या अवतीभोवतीही चुकीच्या प्रवृत्तीचे लोक असता कामा नये.

एखादी गोष्ट हलक्यात घेतली तर त्याची किंमत पक्षाला आणि त्या नेतृत्वालाही मोजावी लागते, असे म्हणत राष्ट्रवादीचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री पवार पान ४

### 'ते कंत्राटदार ब्लॅकलिस्ट करणार'

मी बीड जिल्ह्यात विविध विकासकामांना निधी देणार आहे. पण स्कॉड पाठवून या कामांची पाहणी केली जाईल आणि चुकीचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले जाईल. तसंच पदाधिकाऱ्यांनी पत्र दिले तरी विकासकामांसाठी १० लाखांचा निधी मिळणार नाही. ई टेंडर निघावे, यासाठी १५ लाखाचे टेंडर काढणार, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे.

# अवकाळीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा

## मा. महसूल मंत्री थोरात यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्याच्या पठार भागासह पश्चिम भागात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून त्यांना सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी मा. कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

संगमनेर तालुक्यातील साकुर पठारामधील हिवरगाव पठार, निमज, नांदुरी दुमाला, सावरगाव तळ, चंदनापुरी मिर्झापूर, धांदरफळ खुर्द या गावांमध्ये अवकाळी पाऊस व जोरदार गारपीट झाली. या अवकाळी पावसामुळे होणे नाले तसेच डोंगरकडेही काही वेळ जोरात वाळू लागले होते. शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टातून उभे केलेले कांदा, उन्हाळी बाजरी, गहू, डाळिंब या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी हा सातत्याने मोठ्या संकटात असून अवकाळी पावसाने हातात आलेली पिक वाया गेली आहे.



या नुकसानग्रस्त पिकांची तातडीने पंचनामे करावे, अशी मागणी माजी कृषीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली असून यावेळी ते म्हणाले की शेतकरी मोठ्या कष्टातून पीक उभे करतो. शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक अडचणी असतात. चांगले पीक उभे केल्यानंतर त्याला बाजार भाव मिळत नाही. कर्ज थांबत नाही. अशा सगळ्या परिस्थितीमध्ये त्याला अस्मानी संकटाशी ही सामना करावे लागतो.

संगमनेर तालुक्यातील पठार व पश्चिम भागात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून टोमॅटो, डाळिंब, गहू, उन्हाळी बाजरी व कांदे या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले असून या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी याकरता सरकारने त्वरित नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून लवकरात लवकर या शेतकऱ्यांना भरी मदत करावी, अशी मागणी मा. कृषिमंत्री थोरात यांनी सरकारकडे केले आहे

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी यांनी तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत मिळावी या केलेल्या मागणीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# श्रीरामपूरात रामनवमीची तयारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर येथील आराध्य दैवत श्री रामनवमी उत्सवानिमित्त यात्रा उत्सव समिती यांच्याकडून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीरामपूरातील थत्ते ग्राउंड या ठिकाणी नागरिकांसाठी सुसज्ज राहाट पाळणा, खेळणी तसेच विविध स्वरूपाचे स्टॉल दुकाने थाटणार असल्याने संयोजक समितीच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली आहे.

सालाबादप्रमाणे यात्रा उत्सव साधारण पंधरा दिवसापर्यंत सुरू असून शहरातील तसेच ग्रामीण भागातील माता-भगिनी, आबाल, वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. या परिसरामध्ये संयोजन समितीच्या वतीने सभोवताली पाहणी करण्यासाठी तीस ते पस्तीस कॅमेरे परिसरात बसविण्याचे कामकाज सुरू असून श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन यांच्याकडून परिसरात दोन मदत केंद्रे बसविणार असून माता-भगिनी यांच्यासाठी स्वतंत्र हिरकणी कक्ष स्वतंत्र सुलभ प्रसाधने तसेच संयोजन समिती यांचे स्वतंत्र संपर्क कार्यालय असणार आहे.



सदर परिसर आगळ्या वेगळ्या पद्धतीने रेखांकित केला असून लहान मुलांसाठी स्वतंत्र खेळणी तसेच माता-भगिनी यांच्यासाठी पान ४

> सण व उत्सव साजरे करताना नागरिकांनी प्रशासनस सहकार्य करावे. तसेच थत्ते ग्राउंड परिसरात महिलांच्या सुरक्षेसाठी ३० ते ३५ सीसीटीव्ही कॅमेरे तसेच स्वतंत्र दोन पोलीस मदत केंद्र उभारणार असून माता भगिनी यांच्यासाठी हिरकणी कक्ष उभारणार आहे.
>
> **- नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक**

# विखे कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्नशील

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; पद्मश्री विखे कारखान्याचा गळीत हंगाम सांगता समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** सहकारी चळवळीची ठेवलेली बांधिलकी आणि सभासदांनी दाखविलेल्या विश्वासामुळेच पद्मश्री डॉ. विखे पाटील कारखान्याची ७५ वर्षांची वाटचाल यशस्वी होवू शकली. भविष्यात कारखान्याचे आधुनिकीकरण करण्याबरोबरच, गाळप क्षमता वाढविण्याचा प्रयत्न असून, सभासदांना भाव देण्यातही आपला कारखाना प्रथम क्रमांकावर राहिल, अशी ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा अमृत महोत्सवी गळीत हंगाम सांगता समारंभ माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



या कार्यक्रमास जेष्ठनेते आण्णासाहेब भोसले, चेअरमन कैलास तांबे, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, व्हा. चेअरमन सतिष ससाणे, प्रवरा बॅंकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे, ट्रक्स वाहतूक सोसायटीचे चेअरमन नंदु राठी, व्हा. चेअरमन सुनिल जाधव, चेअरमन गिताताई थेटे, कांचन मांढरे, रोहिणी निघुते, कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संस्थांचे संचालक आणि सभासद उपस्थित होते.

या कार्यक्रमात शेतकरी विकास मंडळाचे चंद्रकांत नारायण डुक्रे आणि मित्र परिवाराने कारखान्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ना. विखे पाटील यांचा सत्कार केला.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, ७५ वर्षांपुर्वी पद्मश्रींनी या साखर कारखान्याचे रोपटे लावले आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. एकीकडे अंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे होत असताना कारखान्याची ७५ पान ४

> केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी त्रिभूवन सहकार विद्यापीठ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या विद्यापीठामुळे सहकारी संस्थांमध्ये संशोधन, प्रशिक्षण आणि तांत्रिक विकासाचे योग्य मार्गदर्शन मिळेल. यामुळे सहकारी संस्थाच्या बळकटीकरणासाठी मोठी मदत होईल. या सहकार विद्यापीठाचे केंद्र महाराष्ट्रात व्हावे.
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा तथा पालकमंत्री**

### ... ही संस्था आता राजकीय अड्डा बनत चालली

विसंतदादा शुगर इस्टिट्युटने आता खासगी संस्थानाही सभासदत्व देण्यास प्रारंभ केल्याने ही संस्था आता राजकीय अड्डा बनत चालली आहे. या संस्थेने सहकारी संस्थांच्या बळकटीकरणासाठी धोरण घ्यायला पाहीजे होते, परंतू तसे झाले नसल्याची टिका मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.

### सहकारी साखर कारखानदारीला स्थैर्य

केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या पुढाकाराने कारखानदारीला मोठे पाठबळ मिळत असून, कारखान्यांवरील आयकराचा बोजा त्यांच्या एका धाडसी निर्णयामुळे कायम स्वरुपी निकाली निघाला. कारखानदारीला आधार देवून शेतकऱ्यांचे हित पाहणारी धोरण केंद्र सरकार घेत असून, इथेनॉल आणि साखरेच्या दराबाबतीत केंद्र सरकारने निर्णय केल्यामुळेच सहकारी साखर कारखानदारीला स्थैर्य मिळाल्याचे ना.विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

# सोमठाणे नलवडे शाळेच्या मुलींचे 'शिष्यवृत्ती'त सुयश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील सोमठाणे नलवडे जिल्हा परिषद शाळेच्या पाच मुलींनी एन. एम. एम.एस शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून हजारो रुपयांची शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी या विद्यार्थ्यांनी पात्र झाले आहेत.

इयत्ता आठवीच्या एकूण सोळा विद्यार्थ्यांपैकी सोळा परीक्षेस बसल्या होत्या. त्यापैकी नऊ विद्यार्थी उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झाल्या आहेत. ५६.२४ टक्के निकालासह जि. प. प्राथमिक शाळा सोमठाणे नलवडे अहिल्यानगर जिल्ह्यात अग्रेसर उत्तीर्ण नऊ विद्यार्थ्यांपैकी लावण्या परदेशी हिला ४८ हजारांची राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे.

तर वैष्णवी कासोळे, वैष्णवी बडे, माधुरी चव्हाण, श्रुती बेरड या चौघींनी प्रत्येकी ३८ हजार ४०० रुपयांची राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती पटकावली आहे.

### अधिकाऱ्यांसह शिक्षकांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस, योजना शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, विस्तार अधिकारी अनिल भवार, रामनाथ कराड, केंद्रप्रमुख मच्छिंद्र गोरे, अमोल नलवडे, सरपंच साखर नलवडे, उपसरपंच आकाश दौंडे, शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गर्जे यांनी अभिनंदन केले.

# पद्मविभूषण पवार पतसंस्थेला १.०१ कोटींचा नफा

## देवेंद्र रोहमारे; अशोकराव काळे व आ. काळेंमुळे पतसंस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील सहकारी पतसंस्था क्षेत्रात अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्थेला २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात १ कोटी १ लाख २४ हजार ६२४ रुपये निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे विद्यमान चेअरमन देवेंद्र रोहमारे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, सहकारी संस्थाना आर्थिक दृष्ट्या





बळकट करण्यासाठी कर्मवीर शंकररावजी काळे यांनी सुरु केलेली पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्था स्व. साहेबांच्या आदर्श विचारांच्या तत्वावर संस्थेचे मार्गदर्शक मा. आ. अशोकराव काळे, आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

संस्थेने मिळविलेल्या नावलौकिकामुळे कोपरगाव शाखेत देखील ठेवीदार व कर्जदार यांनी विश्वास दाखविल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होवून संस्थेची कोपरगाव शाखा सहा महिन्यात नफ्यात आलेली आहे. संस्थेला सलग दोन वर्ष राज्य स्तरावरील उत्कृष्ट कामाबद्दल 'बँको ब्ल्यू रिबन' पुरस्कार मिळालेले आहेत.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहातील कर्मचारी तसेच कोपरगाव शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागातील छोट्या - मोठ्या व्यावसायिकांना स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी पतसंस्थेने भांडवल उपलब्ध करून दिले असून सभासदांचे आणि कर्जदारांचे हित लक्षात घेवून चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ करीत असलेल्या कामातून पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्था दरवर्षी चांगली कामगिरी करीत आहे. त्याबद्दल मा. आ. अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे यांनी चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कौतुक केले आहे.

संस्थेकडे ४३ कोटी ७८ लाख ठेवी असून कर्जवाटप २८ कोटी ६८ लाख आहे. वसूल भाग भांडवल ०१ कोटी १८ लाख, राखीव व इतर निधी १२ कोटी ३० लाख तसेच गुंतवणूक ३० कोटी ५६ लाख आहे. निव्वळ एनपीए ० टक्के असून थकबाकी प्रमाण २.३४ टक्के आहे.

**- मंगेश देशमुख, मुख्य व्यवस्थापक.**

### कोपरगाव शहरात पतसंस्थेची दुसरी शाखा सुरु

कोळपेवाडी व परीसरातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांची वेळेत आर्थिक गरज पूर्ण करून चोख व्यवहाराच्या पद्धतीमुळे संस्थेने सभासद, ठेवीदार यांचा मोठा विश्वास कमविला असून संस्थेचा विस्तार करण्याच्या दृष्टीकोनातून आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील सहा महिन्यापासून कोपरगाव शहरात पतसंस्थेची दुसरी शाखा सुरु करण्यात आली आहे.

# धर्मवीर गडावर बलिदान दिन सप्ताह उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** गुरुवर्य श्री. संत मनोहर मामा भोसले महाराज यांच्या संकल्पनेतुन मराठा क्रांती ठोक मोर्चा महाराष्ट्र राज्य समन्वयक छत्रपती प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष धनाजी साखळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बलिदान दिन सप्ताह समितीच्या वतीने साम्राज्य संरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिना



निमित्त धर्मवीरगड (बहादूरगड) पेडगाव येथे बलिदान दिन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदानाची आठवण माहिती विचारांचा व इतिहासाचा जागर करणे व शंभु राजांच्या कार्यला उजाळा देणे, हा यामागचा हेतु असुन पुढील पिढी धर्मवीर संभाजी महाराज यांच्याप्रमाणे निर्माण व्हावी.

यानिमित्त रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, गड संवर्धन स्वच्छता अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बलिदान सप्ताह समितीच्या वतीने दरवर्षी पिढयानपार बलिदान सप्ताहाचे आयोजन करणार आहोत. वडु बुद्रुकप्रमाणेच धर्मवीर गडाला महत्व आहे.

> पंचक्रोशीतील जनतेने बहादुर गडाला धर्मवीर गड, असे नाव ठेवलेले आहे म्हणून शासनाने जीआर काढुन बहादुरगडाचे नाव धर्मवीर गड असे करावे. अशा आमच्या शासनाकडे मागण्या असुन त्या त्वरीत मान्य कराव्यात अन्यथा आम्हाला जनआंदोलन करावे लागेल. आम्हाला आंदोलन करण्याची वेळ येऊ देऊ नये, असा इशारा शिवशंभो प्रेमीच्यावतीने देतो.
>
> **- धनाजी साखळकर, अध्यक्ष**

### निधन वार्ता

**कंचन बत्रा**

श्रीरामपूर : शहरातील वॉर्ड नं. ७ मध्ये असलेल्या कंचन संतोष बत्रा (वय ५२) यांचे



निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, दीर, पुतणे, जावई व नातू असा परिवार आहे. त्या व्यापारी मंगल कार्यालयाजवळील आकाश हवाई, गिरीष फूट वेअरचे मालक संतोष हेमनदास बत्रा यांच्या पत्नी, आकाश बत्रा यांच्या मातोश्री, सुरेश व गिरीष बत्रा यांच्या भावजयी, आशिष व सुजल बत्रा यांच्या त्या चुलती होत्या.

**गोविंद मयूर**

**श्रीरामपूर :** येथील मेनरोडवरील फळांचे व्यापारी गोविंद बाळकृष्ण मयूर (वय



५७) यांच्या हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन भाऊ, पुतणे असा परिवार आहे. ते गोविंद ज्वेलर्सचे मालक गोपाल, दिगंबर व दिनेश मयुर यांचे थोरले बंधु व आदित्य, पार्थ व साई मयुर यांचे ते चुलते होत.

# नाहुली सोसायटीच्या चेअरमनपदी मगन बहिर

## सभापती प्रा. शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली घुमरे व गर्जे यांच्या गटाचे वर्चस्व

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नाहूली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या सन २०२५ ते २०३० सार्वत्रिक निवडणुकी मध्ये विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या दहा जागा बिनविरोध करत विद्यमान मार्केट कमिटीचे संचालक सचिन घुमरे यांनी बाजी मारली होती.

तसेच उर्वरित तीन जागेसाठी झालेल्या निवडणुकीमध्ये मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत विरोधकांचे डिपॉजिट जप्त केले



होते. यामुळे सहकारातील दिग्गजांना मोठा धक्का मानला जात आहे.

दि. १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीमध्ये चेअरमनपदी मगन शामराव बहिर यांचा व व्हा. चेअरमनपदी अर्जुन गर्जे यांचे एकमेव अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी टी. पी. टेकाळे यांनी काम पाहिले व सहाय्यक म्हणून नाहुली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सचिव अशोक भिलारे यांनी काम पहिले.

> नाहुली सोसायटीच्या पहिल्यांदाच झालेल्या निवडणुकीत सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पॅनल करून निवडणुक लढलेले कार्यकर्ते मार्केट कमिटी संचालक सचिन घुमरे आणि मार्केट कमिटी माजी संचालक काकासाहेब गर्जे यांनी दिग्गजांना धुळ चारत निवडणुकीत १३-० ने यश मिळवत नाहुली सेवा सोसायटी ताब्यात घेतली आहे.

जामखेड तालुक्यातील नाहुली सेवा संस्थेच्या निवडणुकीत विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संचालक सचिन घुमरे व काकासाहेब गर्जे यांच्या नेतृत्वाखाली सुरूवातीला नऊ जागा बिनविरोध झाल्या होत्या. तसेच विरोधकाच्या एका उमेदवाराने माघार घेतल्याने दहावी जागाही आल्या. राहिलेल्या तीन जागेसाठी निवडणुक झाली. या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने तीनही उमेदवार विजयी झाले. यामुळे एकुण तेराच्या तेरा जागांवर विजय मिळवला.

# अरणगावच्या उपसरपंचपदी स्वाती शिंदे बिनविरोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील अरणगाव ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी स्वाती भाऊसाहेब शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. लोकनियुक्त सरपंच पोपट पुंड, ग्रामविकास अधिकारी बोरुडे व ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थितीत १ एप्रिल रोजी निवडणूक पार पडली. विठ्ठल दळवी यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर स्वाती शिंदे यांची बिनविरोध निवड




करण्यात आली.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल दळवी, नम्रता कांबळे, अंजुन सय्यद, प्रतिक्षा पुंड, सतिष दळवी, नंदा कारंडे, सागर कल्हापुरे, प्रतिभा थोरात, मोहिनी जाधव, ईश्वर फसले, मयुर जगताप, सोनाली आमले, नाथा शिंदे, बापू शिंदे उपस्थित होते.

# करंजीच्या कुस्त्यासाठी नाव नोंदणी करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे यात्रेनिमित्त होणाऱ्या कुस्त्यांच्या हंगाम्यासाठी इच्छुक पहिलवानांनी नाव नोंदणी करावी, असे आवाहन करंजी यात्रा कमिटी तर्फे करण्यात आले आहे.



करंजी येथील श्री उत्तरेश्वर महादेवाची यात्रा १० व ११ एप्रिल अशी दोन दिवस चालणार आहे. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी नामवंत पहिलवानांचा हंगामा ११ तारखेला होणार आहे. या हंगाम्यासाठी करंजी, वैजूबाभळगाव, चिचोंडी, घाटशिरस, तिसगाव परिसरातील कुस्ती करणारे इच्छुक पहिलवान असतील त्यांनी ही नाव नोंदणी पै. युवराज करंजुले ८३२९७९४४०७, गणेश साहेबराव अकोलकर ९२८४०८५००५ व सुनील आसाराम अकोलकर ९७६३४८३६३५, उत्तम रामदास अकोलकर ८२६३९०६४५९ यांच्याकडे नाव नोंदणी ३ एप्रिलपर्यंत करावी, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने सरपंच रफिक शेख यांनी केले आहे.

# वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी विकला मुरूम

## एकनाथवाडीचे सरपंच नंदा बळीराम डोंगरे यांचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तालुक्यातील एकनाथवाडी येथील वन विभागाच्या हद्दीतील मुरूम खोदून विकल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत एकनाथवाडीचे सरपंच नंदा बळीराम डोंगरे यांच्यासह ग्राम स्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शासकीय



अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, एकनाथवाडी गावाच्या हद्दीत खूप मोठे वनक्षेत्र आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी संगणमताने वनविभागाच्या हद्दीतील राजरोसपणे मुरूम खोदून विक्री करत आहेत.

तालुक्यातील वन विभागातील बंधाऱ्याची कामे काही स्थानिक कर्मचारी मित्राच्या व नातेवाईकांच्या नावावर जेसीबी मशीन घेऊन करत आहेत.याच मशीनचा वापर मुरूम खोदाईसाठी केला जात आहे.आतापर्यंत हजारो ब्रास मुरूम विक्री केला आहे.त्यामुळे वनविभागाच्या हद्दीत मोठ मोठे खड्डे झाले आहेत.

मुरूम उकडलेल्या खड्ड्यांचे लोकेशन फोटो निवेदनासोबत जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. सरपंच नंदा डोंगरे यांच्यासह ग्रामस्थ विठ्ठल आश्रू डोंगरे व गोरक्ष रामभाऊ खेडकर या ग्रामस्थांच्या साह्या निवेदनावर आहेत.

> वन विभागातील मुरूम अधिकारी व कर्मचारी यांनी विकल्याचा आरोप खोटा आहे. बुधवार (ता. २ ) रोजी एकनाथ वाडी येथे पाहणी केली. वनविभागाच्या हद्दीत काही ठिकाणी मुरूम उकरलेला आहे. काही खड्डे बऱ्याच दिवसाचे आहेत तर काही ताजे आहेत. नुकत्याच खोदलेल्या खड्ड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.काही ठिकाणी करण्यात आलेले खोदकाम वन विभागाच्या हद्दीतील नाही .
>
> **-अरुण साबळे,** वनपरिक्षेत्राधिकारी पाथर्डी.

# पाण्याची उत्पादकता वाढविण्याची गरज

## सुखदेव फुलारी; मुळा पाटबंधारे विभागामध्ये जागतिक जल दिन कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** सध्या अस्तित्वात असलेले पाण्याचे स्रोत व प्रकल्पातील पाणीसाठा याला काही मर्यादा असल्याने जल स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रत्येक गावातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात छोटी-मोठी जलसंधारणाची कामे करून पाण्याची उपलब्धता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून पाण्याची उत्पादकता वाढविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले.

नेवासा तालुक्यातील पाथरवाला माध्यमिक विद्यालयात जागतिक जलजागृती दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाचे



मुळा पाटबंधारे उपविभाग चिलेखनवाडी यांचे वतीने कार्यकारी अभियंता सायली पाटील यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित जलजागृती सप्ताह सांगता कार्यक्रमात शालेय जलसाक्षरता, पाण्याची बचत व संवर्धन काळाची गरज याविषयावर मार्गदर्शन करताना फुलारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अभियंता संदीप पवार होते.माजी सरपंच दत्तात्रय खाटिक, मुख्याध्यापक रमेश खाटीक, सरपंच हरिभाऊ थोरे, शिवनाथ थोरे, राम खाटीक, देविदास खाटीक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदिप झिरपे, लहू खाटीक, बाबुराव म्हस्के, अध्यापक सुनिल पंडित, चंद्रकांत गुंड, ईस्माइल शेख, चंद्रकांत कचरे, संदिप लिपणे, बाळासाहेब म्हसरूप, शाखा अभियंता जितेंद्र कावले आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

# डॉ. विखे पाटील 'कृषी छाया २०२५' उत्साहात

## क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, गोळाफेक, कबड्डी आणि रस्सीखेच स्पर्धेत विद्यार्थी विजेते

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालयात 'कृषी छाया २०२५' या वार्षिक स्नेहसंमेलनाचा शानदार समारोप २९ मार्च २०२५ रोजी झाला. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले तसेच क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो-खो, बॅडमिंटन, गोळाफेक, कबड्डी आणि रस्सीखेच अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या संघांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे




विश्वस्त ॲड. वसंतराव कापरे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून विनयकुमार आवटे (संचालक, कृषी प्रक्रिया व नियोजन, महाराष्ट्र राज्य), तसेच प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रीकल्चर सायन्सचे संचालक डॉ. उत्तमराव कदम उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे यांनी वार्षिक अहवाल सादर करताना विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या यशाची माहिती दिली.

> कृषी क्षेत्रातील स्पर्धा परीक्षा आणि बँकिंग क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा, असे सांगितले. डॉ. उत्तमराव कदम यांनी कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मार्गदर्शन केले, तर ॲड. वसंतराव कापरे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत क्रीडाकौशल्यावरही लक्ष केंद्रित करावे.
>
> **- विनयकुमार आवटे**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपिका मावळे व डॉ. सुरेश खेडकर यांनी केले, तर आभार डॉ. डी. एम. नलावडे यांनी मानले.

# कौठे धांदरफळला वीज पडून दोन गाई ठार

## नुकसानग्रस्त भागाची पंचनामे करण्याचे आ. अमोल खताळ यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील सावरगावतळ निमाज धांदरफळ नांदुरी दुमाला पेमगिरी कौठे धांदरफळ या गावांना अवकाळी पावसाने चांगले झोडपून काढले आहे या अवकाळी पावसाने शेत पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तर कौठे धांदरफळ येथील निवृत्ती रखमा घुले यांच्या मालकीच्या दोन गाईवर वीज पडून त्या दगावल्या आहेत. नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्याचे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी तहसीलदार आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.







संगमनेर शहर आणि तालुक्याला दुपारी साडेतीन पासून ते पाच वाजेपर्यंत जोरदार अवकाळी पाऊस झाला. या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते आणि काढणीला आलेला गहू कांदा काही पिकांचे नुकसान झाले.

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले आहे. दिवसभर कडक ऊन पडते आणि पहाटेच्या वेळी थंडी जाणवते अशातच गेली दोन ते तीन दिवसापासून प्रचंड उकाडा जाणवत होता. पावसाचे वातावरण तयार झाले होते काल बुधवारी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास अचानक आकाशात ढग दाटून आले अन् विजेचा कडकडाट होऊन जोरदार अवकाळी पावसाला सुरुवात झाली. या पावसाने सर्वांचीच धांदल उडाली.

संगमनेर तालुक्यातील सावरगाव तळ या गावाला या अवकाळी पावसाचा चांगलाच फटका बसला. या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले तर या अवकाळी पावसाने शेत पाण्याने तुडुंब भरून गेले, ओढे नाले तसेच डोंगर कडेही काही वेळ जोरात वाहू लागले. पावसाने सर्वत्र पाणीच पाणी झाले सर्वत्र पाणीच पाणी झाल्याने काढणीस आलेले गहू, उन्हाळी बाजरी, हरभरा, कांदे व चारा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असून इतर जीवित हानीची प्राथमिक माहिती प्राप्त झालेली नाही.

### नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करा- आमदार खताळ

संगमनेर तालुक्यातील ज्या गावांमध्ये अवकाळी पावसाने नुकसान झालेले आहे त्या नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करण्यात यावे असे निर्देश आमदार अमोल खताळ यांनी तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांना दिले आहेत. आज गुरुवारी नुकसानग्रस्त गावांचा दौरा आमदार अमोल खताळ हे स्वतः करणार आहेत

# विखे कारखान्याचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर** : प्रवरानगर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाचा पंचवार्षिक २०२५-३० साठीचा निवडणूक कार्यक्रम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांनी जाहीर केला आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार ९ मे २०२५ रोजी मतदान होणार असून १० मे रोजी मतमोजणीनंतर निकाल घोषित केला जाणार आहे. नामनिर्देशन पत्रे निवडणूक निर्णय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालय, राहाता प्रशासकीय इमारत (राहाता तहसील कार्यालय) पहिला मजला, राहाता येथे ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत साप्ताहिक व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मिळतील व स्वीकारण्यात येतील. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी १५ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवार १५ ते २९ एप्रिल या कालावधीत अर्ज मागे घेऊ शकतात. माघारीनंतर प्रत्यक्ष निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निवडणूक चिन्ह वाटप २ मे रोजी करण्यात येईल.



या निवडणुकीसाठी शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून, तर तहसीलदार अमोल मोरे यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याची प्रारूप मतदार यादी २५ फेब्रुवारी व अंतिम मतदार यादी १९ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, असे निवडणूक अधिसूचनेद्वारे कळविण्यात आले आहे.

# पाडळी दर्या येथे जयंती व यात्रोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पाडळी दर्या येथे प्रभू श्रीराम, हनुमान जयंतीनिमित्त आज गुरुवार दि. ३ पासून ते गुरुवार दि. १० पर्यंत ग्रामस्थ, मुंबईकर व पुणेकर मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने नामवंत किर्तनकारांचे हरि किर्तन ठेवून अखंड हरिनाम सप्ताहाचे पाडळी दर्या आयोजन करण्यात आले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे १३ वे वर्षे असून हभप मारूती महाराज कुरेकर, हभप डॉ. नारायण महाराज जाधव, हभप डॉ. विकासानंद महाराज मिसाळ, हभप रामभाऊ राऊत, हभप भास्करगिरी महाराज व वैकुंठवासी हभप दत्तात्रय महाराज शिरोळे यांच्या मार्गदर्शन व कृपाशिर्वादाने अखंड हरिनाम विणा व किर्तन सोहळा काल गुरूवार दि. ३ पासून गुरुवार दि. १० पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या नामयज्ञात महाराष्ट्रातील ज्ञानवान, विद्वान किर्तनकारांची हरि किर्तने होणार असून या कालखंडात पहाटे ४ ते ७ काकडा भजन, सकाळी ९ ते ११ श्री विष्णू सहस्त्रनाम आणि नामजप, सायंकाळी ५ ते ६ वाजता पाडळी दर्याचे हभप राघवानंद महाराज तिकोणे, प्रवचन, सायंकाळी



६ ते ७ हरिपाठ व श्री भैरवनाथ देवाची आरती, रात्री ७ ते ९ पाडळी दर्या येथील हभप रविंद्र महाराज खोसे, नेवासाच्या माऊली आश्रमचे हभप महंत ज्ञानेश्वर महाराज हजारे माऊली, श्रीक्षेत्र आळंदीचे साधक ऱ्हदयरत्न गुरुवर्य डॉ. नारायण महाराज जाधव, श्रीक्षेत्र आळंदीचे हभप किरण महाराज पडवळ, श्रीक्षेत्र आळंदीचे हभप मृदंग अलंकार गुरुवर्य अशोक महाराज पांचाळ, आणे सिद्धपंढरीचे हभप प्रेमानंद महाराज वडगाव शास्त्री, राहुरीचे हभप मनोहर महाराज सिनारे, हभप कृष्णकृपांकित गुरुवर्य डॉ. विकासानंद महाराज मिसाळ हभप यांचे हरि किर्तन होणार आहे.

ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी मातेच्या यात्रेनिमित्त शुक्रवार दि. ११ रोजी पहाटे ५.३० ते ७ वाजता महाभिषेक व आरती, सकाळी ८ ते ९ वाजता मांडव डहाळे, ९ ते १० वाजता देवाची बाशिंगे, १० ते सायंकाळी ५ वाजता बाळगोपाळ व नवस दंडवत, सायंकाळी ७ वाजता देवाची महाआरती, रात्री ८ ते ९ वाजता दिवट्यांची मिरवणूक, ९ ते १० वाजता देवाचा छबिना, रात्री ११ नंतर यात्रा करमणूक कार्यक्रम, तर हनुमान जयंती निमित्त शनिवार दि. १२ रोजी पहाटे ५.३० वाजता हनुमान जन्मोत्सव सोहळा ज्ञानेश्वर महाराज भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम, दुपारी ४.३० ते सायंकाळी ६.३० वाजता कुस्ती शौकिनांसाठी कुस्त्यांचा जंगी हगामा आणि रात्री ७ वाजता यात्रा कमिटी व ग्रामस्थांची यात्रा जमा खर्चाची बैठक संपन्न होणार आहे. तरी या ज्ञानयज्ञ, महाप्रसाद व यात्रोत्सवाचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन पाडळी दर्या ग्रामस्थ, मुंबईकर व पुणेकर मंडळीने केले आहे.

# भगवंत हॉस्पिटलमध्ये स्तन कॅन्सरची यशस्वी शस्त्रक्रिया

## डॉ. ओम मुंडे यांच्याकडून २२ कॅन्सर रुग्णांच्या झाल्या शस्त्रक्रिया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : खर्डा येथील डॉ. भाऊसाहेब गोपाळघरे यांच्या भगवंत हॉस्पिटलमध्ये येथील सोजरबाई अर्जुन शिंदे या महिलेच्या स्तनाच्या कॅन्सरची डॉ.ओम मुंडे (संचालक - मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल संभाजीनगर) यांनी तब्बल दीड तासाच्या अथक प्रयत्नातून यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडली आहे. त्यामुळे त्या महिलेला जीवनदान मिळाले आहे.

यापूर्वीही भगवंत हॉस्पिटलमध्ये दीड वर्षापासून डॉ. ओम मुंडे यांनी कॅन्सरच्या २२ विविध आजाराच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. आजपर्यंत शस्त्रक्रिया झालेल्या कोणत्याही कॅन्सर रुग्णाच्या जीवितेला धोका झाला नाही हे विशेष बाब नमूद करावी लागेल.

डॉ. ओम मुंडे यांनी आपले शिक्षण घेताना घरची परिस्थिती बेताची असताना सुद्धा त्यांनी कष्ट करून व उत्तम गुण मिळवून गव्हर्मेंट मेडिकल कॉलेजला प्रवेश घेतला व आपल्या बुद्धी कौशल्यावर प्रचंड मेहनत, अभ्यास करून ही कॅन्सरशी निगडित सर्वोच्च पदवी प्राप्त केली आहे.



### अल्पदरात होतात शस्त्रक्रिया

खर्डा येथील भगवंत हॉस्पिटल मध्ये अत्याधुनिक सुविधा सहीत आयसीयू, ऑक्सिजन सुविधा व सुसज्ज ऑपरेशन थेटर व तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत या ठिकाणी गेल्या २५ वर्षापासून विविध आजाराच्या शस्त्रक्रिया कमी दरात केल्या जातात त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना हे हॉस्पिटल नव्हे तर आपले घरच वाटत आहे. त्यातच डॉ.भाऊसाहेब गोपाळघरे हे शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांची अहोरात्र सेवा करतात.

# डॉ. नाईक 'वर्ल्ड बुक'कडून सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : डॉ. राम नाईक, ज्यांनी आपल्या आयुष्यातील २३ वर्षे साईसंस्थानच्या साईनाथ रुग्णालयात रुग्णसेवेत घालवली, त्यांनी तब्बल २ लाख ७३ हजार रुग्णांवर उपचार आणि ६० हजार शस्त्रक्रियांचा विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या या अतुलनीय सेवेची दखल लंडनच्या वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने घेऊन त्यांना सन्मानित केले.



डॉ. नाईक यांची रुग्णसेवेप्रती असलेली निष्ठा आणि समर्पण पाहून शिर्डी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील रुई, नादुर्खी खुर्द व बुद्रुक, साकुरी, पिंपळवाडी, सावळेविहीर खुर्द व बुद्रुक, शिंगवे, निघोज, निमगाव, वाकडी या ११ गावांतील ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे तसेच रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांनीही निवेदनाद्वारे त्यांना मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यांची समर्पित रुग्णसेवा व लोकांच्या मागणीचा मान राखत संस्थानने डॉ. नाईक यांना दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉ. नाईक यांचा गौरव सोहळा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी आयोजित केला होता. रुग्णालयाच्या गणवेशातच आलेल्या डॉ. नाईक यांचा सीईओ गाडीलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डचे महेश वैद्य, रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. शैलेश ओक, उपवैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे, अधीक्षिका डॉ. मैथिली पितांबरे जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे आधीसेविका नजमा सय्यद तसेच मोठ्या संख्येने डॉक्टर, कर्मचारी उपस्थित होते. डॉ. नाईक यांची साई संस्थानने त्यांना पद्म पुरस्कार मिळण्यासाठी शिफारस करावी, अशी विनंती डॉ. महेंद्र तांबे यांनी यावेळी केली.

# जेऊर कुंभारीच्या उपसरपंचपदी गंगुबाई जाधव




**जनता आवाज वृत्तसेवा**

**जेऊर कुंभारी** : कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी कोल्हे गटाच्या गंगुबाई बाळासाहेब जाधव यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जेऊर कुंभारी ग्रामपंचायतमध्ये उपसरपंचपदी वैशाली संदेश भोंगळे यांनी ठरलेल्या रोटेशन पद्धती नुसार आपला कार्यकाळ पूर्ण करून आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी सरपंच सुवर्णा पवार यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया घेण्यात आली.

याप्रसंगी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिन शंकररावजी कोल्हे तसेच माजी आमदार स्नेहलता कोल्हे व युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली जेऊर कुंभारी ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदासाठी गंगुबाई बाळासाहेब जाधव यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. याप्रसंगी या निवड प्रक्रियेत एकमेव अर्ज गंगुबाई जाधव यांचा आल्याने त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याचे सरपंच सुवर्णा पवार यांनी जाहीर केले. यावेळी सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याचे प्रोसिडिंग ग्रामविकास अधिकारी संजय दुशिंग यांनी उपस्थित सर्व सदस्य व गावकरी यांना वाचून दाखवला. याप्रसंगी सहकार महर्षी शंकररावजी कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब वक्ते, संचालक सतीश आव्हाड, मधुकरराव वक्ते, शिवाजीराव वक्ते, रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्राचे प्रदेश सचिव दिपकराव गायकवाड, विजय रोहम, रमेश वक्ते, संजय वक्ते, संदेश भोंगळे, बाळासाहेब जाधव, भीमराज वक्ते, जालिंदर चव्हाण आदी उपस्थित होते.

# श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यासाठी साई संस्थान सज्ज

## दि. ५ ते ७ एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**


**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या वतीने यावर्षी शनिवार दि. ५ एप्रिल ते सोमवार दि. ७ एप्रिल २०२५ याकाळात ११४ वा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. साईबाबा संस्थाकडून १ लाख ७३ हजार ३४ भक्तमंडळ सभासदांना श्रीरामनवमी उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठविण्यात आलेल्या असून ई मेल द्वारे देखील आंमत्रित करण्यात आलेले आहे. श्रीरामनवमी उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे.

मुंबई येथील व्दारकामाई मंडळाच्या वतीने ४ नंबर प्रवेशव्दाराचे आतील बाजुस श्री गजमुख गणपतीचा भव्य काल्पनिक देखावा तसेच मंदिर व संस्थान परिसरात व्दारकामाई मंडळ व मुंबई येथील साईभक्त कपील चड्ढा यांचेवतीने आकर्षक विद्युत रोषणाई उभारण्यात येत आहे. सौदी अरेबिया येथील दानशुर साईभक्त व्यंकटा सुब्रमण्यण यांच्या देणगीतून आकर्षक फुलांची सजावट करण्यात येणार आहे. तसेच उत्सव काळात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. श्री. गाडीलकर म्हणाले, श्रीरामनवमी उत्सवाची सुरुवात १९११ मध्ये श्री साईबाबांचे अनुमतीने करण्यात आली. तेंव्हापासून प्रतीवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात शिर्डी येथे साजरा केला जातो. संस्थानकडे श्रीराम नवमी उत्सवाकरीता वेगवगळ्या ठिकाणांहून येणाऱ्या ८७ पालख्यांनी नोंदणी केलेली आहे. उत्सवात होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून दर्शनाची व्यवस्था सुखकर व्हावी, तसेच भाविकांचे उन्हापासुन संरक्षणाकरीता मंदिर व संस्थान परिसरात सुमारे ६७ हजार ४०९ चौ. फुट मंडप उभारण्यात आलेले आहेत. तसेच साईभक्तांच्या अतिरिक्त निवासव्यवस्थे करीता साईबाबा भक्तनिवास स्थान, साईधर्मशाळा याठिकाणी सुमारे ३८ हजार ७९० चौ. फुट निवासी कापडी मंडप, बिछायत व कनातीसह मंडपाची उभारणी करण्यात आलेली आहे.

पालखी थांब्याच्या ठिकाणी सुमारे १ लाख १७हजार चौ. फुट कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारण्यात आलेले असून यामध्ये विद्युत व पाणी पुरवठ्याची सोय करण्यात आलेली आहे. पालखीतील साईभक्तांसाठी यावर्षीपासून पालखी थांब्यांच्या ठिकाणी भजन व कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. पालखीतील साईभक्तांच्या व्यवस्थेकरीता मोबाईल टॉयलेट व्हॅनची व्यवस्था तसेच साईबाबांच्या प्रचार प्रसाराकरीता पालखी थांब्यांच्या ठिकाणी एलईडी व्हॅनची व्यवस्था करणेत आली आहे. पालख्या शिर्डी येथे आल्यानंतर पदयात्रींची साई धर्मशाळा येथे नाममात्र दरात निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

### १८० किंटलचा बुंदी व लाडू प्रसाद

उत्सव काळात साईप्रसादालयात अंदाजे २ लाखाहून अधिक साईभक्त प्रसाद भोजन घेतील असे नियोजन करणेत आलेले आहे. उत्सव कालावधीत भक्तांना प्रसाद लाडू पॅकेट सहजतेने उपलब्ध व्हावे यासाठी १८० किंटलचा बुंदी व लाडु प्रसाद तयार करण्यात येणार असुन नवीन दर्शनरांग, साईनाथ मंगल कार्यालय, साईप्रसादालय, सेवाधाम इमारत व सर्व निवासस्थाने आदी ठिकाणी लाडू विक्री केंद्र उभारण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यकता भासल्यास अतिरिक्त लाडू विक्री केंद्र उभारण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.



### मुख्य दिवशी विविध कार्यक्रम

उत्सवाच्या मुख्य दिवशी, रविवार दि. ६ एप्रिल रोजी पहाटे श्रींची काकड आरती, पहाटे अखंड पारायणाची समाप्ती होवून श्रींचे पोथी व प्रतिमा मिरवणूक होईल. सकाळी कावडी मिरवणूक, श्रींचे मंगलस्नान व दर्शन. सकाळी श्रींची पाद्यपुजा, विक्रम नांदेडकर, गोरटे यांचा श्रीरामजन्म कीर्तन कार्यक्रम तर दुपारी श्रींची माध्यान्ह आरती होणार आहे. दि. ०६ एप्रिल रोजीची नित्याची शेजारती व दि. ०७ एप्रिल रोजीची पहाटेची काकड आरती होणार नाही.

# श्रीराम नवमीनिमित्त पारायणाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीराम नवमीनिमित्त येथील श्रीराम मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण रविवार, दि. ३० मार्च पासून सुरू झाले आहे. येत्या ६ एप्रिलपासून श्रीराम जन्मोत्सव व श्रीराम नवमीस प्रारंभ होत आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मंदिरात सुरू झाले आहेत.

रविवार, दि. ३० मार्च पासून ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे पारायण सुरू झाले असून ह.भ.प. कावले महाराज व्यासपीठ सांभाळत आहेत. तर ह.भ.प. तुकाराम महाराज कदम हरिपाठ सेवा देत आहेत. काकडा-काकडा भजनी मंडळ, मार्केट यार्ड भजनी मंडळ, दररोज संध्याकाळी ७ वा. श्रींची आरती, गुरुवार, दि.३ रोजी श्रीराम मंदिर ट्रस्ट व श्रीराम यात्रा कमिटी यांच्या हस्ते भजनी मंडळाचा सत्कार सायं. ७ वा. तसेच मंगळवार, दि.८ एप्रिल २०२५ रोजी बेलापूर येथील हरिहर भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे.

रविवार, दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. भगवान महाराज मोरे (देहुकर) यांचे कीर्तन होणार आहे. मंदिर ट्रस्टचे अध्यक्षा श्रीमती प्रणिता राजन गिरमे, सेक्रेटरी दिनेश सूर्यवंशी, रोनक गिरमे, रमेश झिरंगे, वैशाली गिरमे, अशोक फोफळे, अमोल महाले, प्रतिक बोरावके मंदिर पुजारी वाडेकर गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाकर अंभोरे, बाळासाहेब चव्हाण, सोमनाथ दहिकर, योगेश लाटणे, प्रदिप वाडेकर, दिनेश अंभोरे, कविता त्रिवेदी, सौ.चव्हाण हे सेवा नियोजन करीत आहेत.



## संपादकीय

# म्हाडा सर्वसामान्यांची स्वप्ने साकारणार

महायुती सरकार किंवा मोदी सरकार यांनी सर्वांना परवडणाऱ्या घरांची योजना आणण्याचे वचन दिले होते. त्यानुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काही दिवसांपूर्वी जाहीर केले होते की, म्हाडा म्हणजे महाराष्ट्र क्षेत्र विकास प्राधिकरणाने राज्यात आठ लाख घरे येत्या पाच वर्षात बांधण्याची योजना हाती घेतली आहे. त्याचाच एक भाग म्हणून म्हाडाच्या अर्थसंकल्पात मुंबई, पुणे, नाशिक, कोकण, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे एकूण १९ हजार ४९७ घरांचे बांधकाम करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यासाठी म्हाडाने ९ हजार २०२ कोटी रुपये ७६ लाख रुपयांची तरतूद केली आहे. सर्वत्र घरांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत आणि या परिस्थितीत म्हाडाच्या घरे जर परवडणाऱ्या किमतीत मिळत असतील, तर रहिवाशांचे स्वप्न साकार होणार यात काही शंका नाही. त्यामुळे या घोषणेला महत्त्व आहे. मुंबई, पुणे, नाशिकसह अन्य महानगरात घरे घेण्याचे स्वप्न साकार होणार आहे हे निश्चित आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुंबईसह कोकणातील तसेच नाशिक शहरातील सर्वसामान्य रहिवाशांचे स्वत:च्या घरात राहण्याचे स्वप्न साकार होणार आहे आणि ही घरे परवडणाऱ्या किमतीत असतील हे विशेष आहे. परवडणारी घरे उपलब्ध का होऊ शकत नाहीत तर त्याला उत्तर आहे की, स्वस्तात जमीन उपलब्ध न होणे आणि हाच मोठा अडसर या योजनेतर्गत आहे. कमाल जमीन धारणा कायद्यानुसार जमीन मिळणे शक्य होते. पण शहरातील घरबांधणीचे प्रमाण वाढते आहे आणि जागांच्या किमती वाढतील असा दावा करत हा कायदाच रद्द करण्यात आला. पण त्यामुळे समस्या सुटली नाहीच. उलट घरांसाठी लोकांच्या रांगा लागू लागल्या आणि घरांसाठी दावे ठोकणे आणि एकमेकांच्या मालमत्तेवर हक्क सांगणे असे जीवघेणे प्रकार सुरू झाले. घरांची ही समस्या नुसती एवढ्यावर थांबली नाही तर प्रचंड अनर्थ ओढवले. त्यामुळे मोदी सरकारने आणि फडणवीस सरकारने यावर उपाय शोधून म्हाडाची घरे, स्वस्तात घरे उपलब्ध करून द्यायची. त्यानुसार ही योजना आता आणली आहे. पण मुंबई, पुणे आणि नाशिक अशा महानगरात विकसित होणाऱ्या शहरात जागांच्या किमती अवाच्या सव्वा वाढत आहेत आणि त्यामुळे परवडणारी घरे उपलब्ध करून देणे ही मोदी सरकारची अत्यंत चांगली आणि महत्त्वाकांक्षी योजना आहे यात काही शंका नाही. कोणतेही महानगर असो, तेथे खरा प्रश्न जमिनीच्या उपलब्ध होण्याबाबतचा आहे. यामुळे मुंबईत तरी अन्न, वस्त्र आणि या आपल्या मूलभूत गरजा भागवता येतील पण घरांची गरज भागवता येणे शक्य नाही. हे ओळखून मोदी सरकारने ही योजना आणली आहे. महाराष्ट्र सरकारने ही योजना महाराष्ट्रात अमलात आणण्याचे ठरवले आहे आणि त्यामुळे म्हाडाची जरी ही योजना असली तरी ती महाराष्ट्र सरकारची आहे. मुंबई, पुणे या शहरात आज घर घेणे जवळपास अशक्य आहे. करोडपती सोडाच पण श्रीमंतांनाही स्वत:चे घर मिळवणे अत्यंत अवघड जात आहे. मग गरिबांचा विचार न केलेला बरा. हे सर्व लक्षात घेऊन सरकारने म्हाडाच्या माध्यमातून स्वस्तातील घरे उपलब्ध करून देण्याचा पर्याय स्वीकारला. मुंबई, पुणे आणि नाशिकमध्येही १५ ते २० हजार रुपये महिना पगार असलेली व्यक्ती घर घेऊ शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे त्यामुळे ही योजना किती महत्त्वाची आहे हे लक्षात येईल आणि परवडणाऱ्या घरांची अवस्था बरी आहे.

पण खासगी विकासकांच्या घरांची अवस्था अशी आहे की, जागेची किंमत, बांधकामाचा खर्च आणि तयार घराची किमत याचा काहीच ताळमेळ राहिलेला नाही. बिल्डरने मनाला येईल तो दर सांगावा आणि घर घेऊ इच्छिणाऱ्याने तो दर मान्य असेल तरच ते घर घ्यावे. कित्येक तयार घरे अशा पद्धतीने पडून आहेत. पण बिल्डरांची सहनशीलता जास्त असल्याने त्यांना विकली गेली नाही तरी परवडते. आता सरकारने पुढाकार घेऊन सामान्यांना परवडणारी घरे देण्याची योजना आणली असून मोदी सरकारची आवास योजना तर या योजनेचा मेरूमणी आहे. त्यामुळे लाखो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. म्हाडा स्थापन करण्यामागे सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून देण्याचे हेच तर उद्दिष्ट आहे. त्यामुळे लाखो नागरिकांना जे स्वतःचे घर घेऊ इच्छितात पण त्यांची एकरकमी घर घेण्याची ऐपत नाही त्यांना हा दिलासा आहे. परवडणारी घरे हा सामान्यांचा अधिकार आहे हे सरकारने कधीच मान्य केले आहे. त्यामुळे आता सरकारच्या या योजनेचे चांगले स्वागत झाले. पण आता घरांच्या किमती शहरात तर श्रीमंतांनाही परवडेनाशा झाल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी ही योजना सरकारने आणली आहे आणि तिला प्रचंड प्रतिसाद मिळतो आहे. आता या नव्या घोषणेचे प्रचंड स्वागत होईल यात काही शंका नाही. कारण लोकांची गरजच तशी आहे. अन्न, वस्त्र निवारा या तीन मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत हे आपल्याला माहीतच आहे. पण आता यातील निवारा गरज ही सर्वात भीषण बनली आहे. तिला काहीसा दिलासा मोदी आणि महायुती सरकारने काही प्रमाणात तरी दिला आहे असे म्हणायला हवे. आता या योजनेमुळे लोकांचे घरांचे स्वप्न साकार होईल आणि त्यांच्यावर 'दो दिवाने शहर में आबदाना ढूंढते है' असे म्हणण्याची वेळ येणार नाही. त्यामुळे म्हाडाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचे स्वागत आहे. घरांच्या कितीतरी योजना आल्या आणि गेल्या, पण त्यांचा बिल्डरांना फायदा झाल्याशिवाय काहीही उपयोग झाला नाही. एफएसआय यामुळे बिल्डरांना अमाप फायदा होतो, आता महारेरा कायदा लागू केला आहे आणि त्यामुळे बिल्डर मनमानीपणे निर्णय घेऊ शकत नाहीत आणि मनाला येईल तो दर लावू शकत नाहीत. त्यामुळे ही योजना महत्त्वाकांक्षी तर आहेच पण बिल्डरच्या अनिर्बंध महत्त्वाकांक्षेला चाप लावणारी आहे.

# अर्थव्यवस्था हेलपाटून जाऊ नये, म्हणून...

**परामर्श**

**– हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार



अलिकडेच महाराष्ट्राचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प मांडला गेला. त्यामधून राज्याला वित्तीय शिस्तीची किती गरज आहे, हेच अधोरेखित झाले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी अनेक योजनांची खैरात करण्यात आली, त्याच वेळी यामुळे अर्थव्यवस्था हेलपाटून जाईल, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला होता. या निमित्ताने एकूणच राज्याच्या अर्थव्यवस्थेतील काही दोषस्थळे समजून घेता येतात.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये दोन लाख ७८ हजार रुपयांवरून ३ लाख ९ हजार रुपयांपर्यंत वाढ झाली असली, तरी देशपातळीवर दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो, पहिला नव्हे! गुजरातने निर्यातीबरोबर दरडोई उत्पन्नातही महाराष्ट्राला मागे टाकून पुढचे स्थान पटकावले आहे. आधी तेलंगण, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात आणि नंतर मग महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. २०२३-२४ मध्ये राज्याचा विकासदर आठ टक्के होता. यंदा, म्हणजेच २०२४-२५ मध्ये घसरून तो ७.३ टक्क्यांवर येईल. याचा अर्थ 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे म्हटले जात असले, तरी तो फक्त प्रचाराचाच भाग आहे. उद्योगक्षेत्रात देशात वर्षानुवर्षे आपण अग्रेसर राहिलो. परंतु या क्षेत्राचा विकासदर गेल्या वर्षीच्या ६.२ टक्क्यांवरून घटून ४.९ टक्के होईल, असा अंदाज आहे. त्यातही उत्पादन किंवा निर्मितीक्षेत्रात २०२३-२४ मध्ये विकासदर ६.८ टक्के होता. घसरण होऊन यंदा तो ४.२ टक्के होण्याची शक्यता आहे. वास्तविक, शेतीमधून जास्तीत जास्त लोकांना बाहेर आणून उद्योगात सुस्थापित करायचे असेल तर निर्मितीक्षेत्राचा विस्तार व्हायला हवा. शेती आतबट्ट्याची असल्यामुळे, उत्पादनक्षेत्राची भरभराट होणे आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी त्याच्या प्रगतीचा वेग मंदावणे, ही चिंतेची बाब आहे. उद्योगांप्रमाणे सेवाक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. पण सेवाक्षेत्रातही ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्के अशी पिछेहाट झाली आहे.

आज महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक येत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु त्या प्रमाणात रोजगाराम ध्ये वाढ होत असल्याचे दिसत नाही. गेल्या तीन वर्षांमध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या ५८ लाखांवरून ७० लाखांपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याचे बंधन शासनावर आहे. परंतु चालू आर्थिक वर्षात महायुती सरकारने या खर्चाला लक्षणीय प्रमाणात कात्री लावली आहे. तसेच डबल इंजिन सरकार असल्याचे सांगितले जात असले, तरी यंदा केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीमध्ये १९ टक्क्यांची घट होणार असल्याची माहिती आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला ३५०कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. परंतु एसटीला ९९३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. महामंडळाकडून ३ हजार २६० कोटी रुपयांची देणी थकित आहेत. या परिस्थितीत महामंडळाने कारभार कसा करायचा, असा प्रश्न आहे.

मागील वर्षी सर्वत्र उत्तम पाऊस झाल्यामुळे शेती आणि संलग्न क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात ३.३ टक्के असलेला विकासदर यंदा ८.७ टक्क्यांवर गेला. परंतु यात राज्य सरकारचा असा काहीच वाटा नाही. उलट, राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र नक्की किती वाढले, याची आकडेवारी गेली बारा वर्षे दिली जात नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबद्दलचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्ष सिंचनक्षेत्र किती वाढले, हे जनतेला कळणे आवश्यक आहे. आजही राज्याची अर्थव्यवस्था सिंचनावर अवलंबून असून अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र खूप कमी आहे. कृषि प्रक्रिया उद्योग वाढले पाहिजेत, असे केंद्र आणि राज्य सरकार सतत सांगत असते. परंतु त्यासाठी कृषि सिंचनात लक्षणीय वाढ होणे आवश्यक आहे. राजकोषीय तूट कमी असावी अशी तरतूद असली, तरी यंदा आपण तुटीच्या सीमारेषेच्या जवळ आलो आहोत, ही नक्कीच काळजी करण्यासारखी बाब आहे.

महाराष्ट्रातील किरकोळ व्यापारात घट झाली आहे. म्हणजे, लहान-लहान दुकाने, चहा, किराणा वगैरे. त्याउलट ठोक व्यापारात रोजगाराचा टक्का वाढला आहे. छोटे व्यापारी व्यवसाय बंद होत आहेत, तर मोठे वाढत आहेत. वाहतूक सेवेतील रोजगाराची टक्केवारी कमी झाली आहे. पर्यटक, टॅक्सी, ऑटो रिक्षा यात आता पूर्वीसारखी रोजगारक्षमता राहिलेली नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या टक्केवारीत घट झाली आहे. दुसरीकडे, वस्त्रोद्योग म्हणजेच टेलरिंगचे लहान लहान व्यवसाय किंवा छोटे कारखाने यात रोजगाराचा टक्का वाढला आहे. यातील बहुसंख्य महिला आहेत आणि त्यांचे शिलाईचे अगदी लहान, घरगुती स्वरूपाचे व्यवसाय आहेत. इथे टक्केवारी वाढते आहे. आर्थिक निकड भागवण्यासाठी यातील बहुतेक व्यवसाय केले जातात. यातून कुटुंबांवर वाढलेला आर्थिक ताण दिसतो. टपऱ्यांवर अवलंबून असलेल्या रोजगाराचे प्रम ाणही वाढले आहे. यातूनही वाढलेला आर्थिक ताण दिसून येतो. घरकामातून रोजगार मिळवणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे. वित्तीय सेवांमधील रोजगाराची टक्केवारी वाढली आहे. यात प्रामुख्याने पतपेढी वगैरे रोजगार आहे. शेतीबाहेर रोजगाराची टक्केवारी वाढत आहे, हे चांगले; पण त्यातील बराच रोजगार आर्थिक ताणातून काही तरी करण्याची गरज असल्यामुळे केलेला, कमी उत्पादक, कमी मोबदला असलेला, लहान धंदे बंद पडून होत असलेला अस्थायी स्वरूपाचा आहे हे चांगले नाही. हे निष्कर्ष भारत सरकारच्या 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे'वरून काढले आहेत.

महाराष्ट्रातील दारिद्र्य आणि विषमता, २०२२-२३ च्या राष्ट्रीय नमुना चाचणीच्या 'कन्झंप्शन एक्स्पेंडिचर सर्व्हे'वरून प्रत्येक राज्यातील दारिद्र्याचे आणि विषमतेचे प्रमाण काढता येते. अर्थात, या सर्व्हेमध्ये खूप श्रीमंत लोक येत नाहीत. त्यामुळे हा सर्व्हे आर्थिक विषमतेचे प्रमाण कमी दाखवतो. ग्रामीण महाराष्ट्राइतकी आर्थिक विषमता इतर कुठल्याही राज्यात नाही. पंजाब, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यांमध्ये ग्रामीण दारिद्र्य आणि विषमता हे दोन्ही घटक राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहेत. पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार समितीने देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात्तील महाराष्ट्राचा टक्का कमी झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. पण महाराष्ट्राची 'आर्थिक पिछेहाट' झाली आहे किंवा नाही याबाबत ठोस निष्कर्ष काढायचा असेल, तर एवढेच पुरेसे नाही. देशाच्या औद्योगीकरणातील महाराष्ट्राचा टक्का कमी होत आहे. महाराष्ट्रात श्रमाची उत्पादकता अजूनही देशापेक्षा जास्त असली तरी हा फरक आता कमी होतो आहे. ही प्रक्रिया २०१४-१५ पासून अधिक वेगाने होत आहे. महाराष्ट्रातील रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. स्वयंरोजगार, खास करून महिलांचा स्वयंरोजगार वाढतो आहे. हा रोजगार प्रामुख्याने अगदी लहान-लहान व्यवसायातून आहे. यातील काही भाग तरी कुटुंबावर आर्थिक ताण वाढला, हे आहे. ग्राम ीण महाराष्ट्रात दारिद्र्य आणि विषमता यांचे प्रमाण देशातील सरासरीपेक्षा जास्त आहे. एकूणच यावरून राज्याची आर्थिक स्थिती इतर काही राज्यांच्या तुलनेत घसरली आहे आणि शेतीव्यवस्थेने सध्या हात दिला असला, तरी उत्पादन आणि सेवाक्षेत्राने मात्र निराशा केली, असा त्याचा अर्थ आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे आणि देशात सर्वाधिक करमहसूल गोळा करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा अधिक आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने स्वतःचाच विक्रम मोडला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान अलिकडेच म्हटले. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करार केले. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. राज्यात गेल्या दहा वर्षांमधील सर्वाधिक एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक ही अवघ्या नऊ महिन्यांमध्ये आली आहे. येत्या पाच वर्षांमध्ये घरगुती ग्राहकांच्या वीज दरात २४ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच केली आहे. परंतु भूखंड वाटप केले जाताना होणारा भ्रष्टाचार, खंडणी याबद्दलच्या महाराष्ट्रातील उद्योजकांच्या तक्रारीही दूर होणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने देणे पुरेसे नाही.

# महादजी शिंदे विद्यालयाची एनएमएमएस परीक्षेतील उत्तुंग कामगिरी

## एनएमएमएस परीक्षेत १५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून नुकताच एन एम एम एस परीक्षेचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला या निकालामध्ये महादजी शिंदे विद्यालयाच्या पंधरा विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयाने एन एम एम एस परीक्षेमध्ये उत्तुंग भरारी मारली आहे आणि उत्कृष्ट यश संपादन केले आहे.



**शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी**

कुरुमकर समर्थ अतुल ,पवार भूषण राजेंद्र ,लहाकर कृष्णा नितीन, डांगे स्वेत धर्मेंद्र, लवांडे हर्षल सुनील, पवार सुरज नितीन, खामकर अजिंक्य शरद, जामदार पृथ्वीराज सागर, गिरमकर धृवेश हनुमंत, कुलकर्णी रुद्रा सचिन, रायकर सोहम कुंडलिक , पवार सुजल संजय, थोरात अनुज संदीप, सोनवणे हर्षल धनंजय, ढेबरे अर्जुन रूपचंद या सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षी १२००० रुपये प्रमाणे एका विद्यार्थ्याला ४ वर्षात ४८००० रुपये इतकी शिष्यवृत्ती प्राप्त होईल . तसेच या १५ विद्यार्थ्यांना ४ वर्षात १५ विद्यार्थी ४८००० एकूण ७२०००० इतकी शिष्यवृत्ती प्राप्त होइल.

**सारथी शिष्यवृत्ती ४८ विद्यार्थ्यांनी मिळवली?**

त्यांना प्रत्येकी रू. ९६०० दरवर्षी याप्रमाणे ४ वर्षात १,८४,३२०० एवढी शिष्यवृत्ती प्राप्त होईल

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक विभाग प्रमुख दत्तात्रय मोरे,बापू जाधव, विलास लबडे,अंकुश हिंगणे, सुधीर साबळे, प्रविण तिटकरे, सीमा जगताप, सुवर्णा शेलार, शेळके ए .बी यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, आमदार विक्रमसिंह पाचपुते, माजी आमदार बबनराव पाचपुते , विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपप्राचार्य शहाजी एकाड, पर्यवेक्षक सुनिता काकडे-भुजबळ, विभागीय अधिकारी , सहा. विभागीय अधिकारी व सर्व सदस्य स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सर्व सदस्य माता पालक व शिक्षक पालक संघ, यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# प्रा.अमृत आहेरांना पीएच.डी. प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रा. अमृत साहेबराव आहेर यांना नुकतीच जयपुर येथील विवेकानंदा ग्लोबल विद्यापीठ मधील ''एक्सपेरीमेंटल ईव्हॅल्युएशन ऑफ एस. ए. ई. १५ डब्ल्यु ४० ल्युब्रिकेंटींग ऑईल बाय ॲडींग नॅनो पार्टीकल्स ॲडेटिव्हज् टु एन्हान्स ट्रायबॉलॉजीकल प्रापर्टीज् या विषयावर यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यावाचस्पती पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली.

**मान्यवरांकडून डॉ. आहेर यांचे कौतुक**

डॉ.अमृत आहेर यांच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, प्रभारी सेक्रेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड यांनी त्यांचे कौतुक केले.

सदर अभ्यासक्रमात त्यांना जयपुर येथील विवेकानंद ग्लोबल विद्यापीठाचे मेकॅनिकल इंजिनियर विभाग प्रमुख प्राध्यापक विजयकुमार पांडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. आहेर यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास



करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ०२ पेपर प्रेझेंटेशन केले. तसेच नॅशनल व इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ३ पेपर्सचे पब्लीकेशन झालेले आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## वक्फ संशोधन विधेयकावरून वादळ?

जर हे विधेयक संसदेत मंजूर झाले तर आम्ही त्याविरुद्ध देशव्यापी आंदोलन सुरू करू. आम्ही गप्प बसणार नाही. आमच्याकडे उपलब्ध असलेल्या सर्व कायदेशीर आणि संवैधानिक तरतुदींचा आम्ही वापर करू. प्रस्तावित सुधारणा मागे घेईपर्यंत आम्ही शांततापूर्ण आंदोलन करू. हे विधेयक भेदभाव करणारे आणि सांप्रदायिकदृष्ट्या प्रेरित आहे.

## विखे कारखान्याची गाळप क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्नशील

वर्षांची वाटचाल पुर्ण होणे ही सहकार चळवळीसाठी मोठी अभिमानाची बाब आहे. अनेक चढ-उतार पाहुनही ही साखर कारखानदारी शेतकऱ्यांच्या मालकीची राहीली, हे या यशस्वी वाटचालीचे महत्व असून, शेतकरी, सभासदांच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयांमुळेच ७५ वर्ष हा कारखाना अविरतपणे सुरु राहीला. राज्यातील सहकार चळवळीपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले पण ते सोडविण्यासाठी कोणीही पुढाकार घेतला नाही. जाणते राजे सुध्दा दिल्लीत फक्त शिष्टमंडळ घेवून जात होते. सहकारी संस्थाचे प्रश्न न सुटल्यामुळेच अनेक सहकारी संस्था बंद पडल्या. सहकारी कारखान्यांचे खासगीकरण झाले. कवडीमोल भावाने कारखाने विकले गेले. केवळ सहकारातील संस्थाना दडपून टाकायचे, एक प्रकारची दहशत निर्माण करायची. राजकीय सोयीसाठी या संस्थाना वापर झाला. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सहकार मंत्रालय स्थापन झाल्यानंतर सहकार चळवळीला मोठी बळकटी मिळाली असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी आवर्जुन सांगितले. आज राज्यातील बोटावर मोजण्या इतक्या जिल्हा सहकारी बॅंका चांगल्या पध्दतीने सुरु आहेत. अहिल्यानगर जिल्हा बॅंकेनेही चांगले काम करुन, साखर कारखानदारीला आधार देण्याचे काम केल्यामुळेच जिल्ह्यातीही सहकारी साखर कारखाने तग धरु शकले. यंदाचा गाळप हंगाम आव्हानात्मक होता. डॉ. विखे पाटील कारखान्याच्या संचालक मंडळाने योग्य नियोजन करुन, गाळप हंगाम यशस्वी केला याबद्दल अभिनंदन करुन, मंत्री विखे पाटील म्हणाले की, भविष्यात यावर आता येथेच थांबून चालणार नाही. आपल्याला कारखान्याचे आधुनिकीकरण करुन, गाळप क्षमता वाढवायची आहे. कार्यक्षेत्रात ऊसाचे उत्पादन अधिक निर्माण करावे लागेल. पाण्याचे योग्य नियोजन असल्यामुळे पाण्याची समस्या भेडसावणार नाही. पाण्याचे आवर्तन योग्य पध्दतीने झाल्यामुळेच बंधारे आज भरलेले आहेत. येत्या ७ तारखेपासून भंडारदरा धरणातून आवर्तन सुरु करण्यात येणार असल्याची माहीती त्यांनी दिली. आणखी दोन आवर्तनांचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी सांगितले की, पद्मश्रींनी रुजविलेला सहकाराचा विचार खासदार यांनी यशस्वीरित्या पुढे नेला. आज तिसरी पुढी यात काम करीत आहे. सहकारी चळवळीचे खासगीकरण होवू नये, म्हणून खासदार यांना संघर्ष करावा लागला. यामध्ये त्यांचा स्वार्थ नव्हता. सहकार चळवळीतून या भागात सामाजिक आधारही सर्वांना मिळाला. एका विचाराने काम होवू शकले.

## श्रीरामपूरात रामनवमीची तयारी

स्वतंत्र रहाट पाळणे अशी व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी सागर बेग यांच्या मार्गदर्शनाखाली येथील सामाजिक कार्यकर्ते रवींद्र जाधव तसेच त्यांचे सहकारी विशेष प्रयत्न करत आहेत. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी सोनू बेग, अंकुश जेधे, प्रकाश मेहत्रे, सुनील शेळके, अशोक तुपे, राजेश वाव्हळ, प्रसाद दळवी, लखन माखिजा, संघर्ष दिघे, शेखर माळवे, गणेश करमासे, विशाल जाधव, सागर शेटे आदी पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

## ...सर्व गॅंगला सुतासारखे सरळ करणार

यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांना सूचक इशारा दिला आहे. बीडमध्ये आयोजित राष्ट्रवादीच्या युवा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत झालेल्या विविध घटनांमुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची मोठी नाचक्की झाली. जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांच्या अनेक निकटवर्तीयांचा गुन्हेगारी घटनांमध्ये सहभाग आढळून आल्याने पक्षाच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम झाला. या पार्श्वभूमीवर आज बीड जिल्ह्यात पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या युवा संवाद कार्यक्रमात पवार यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना गुन्हेगारी घटनांपासून दूर राहण्याचा कानमंत्र दिला आहे. अजित पवार आपल्या भाषणात म्हणाले की, मागच्या काही काळापासून जिल्ह्यात चुकीच्या प्रवृत्तीच्या लोकांनी डोके वर काढले आहे. हे आपल्याला सर्वांना मिळून थांबवायचं आहे. त्यासाठी राष्ट्रवादीच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन काम करावे.समाजात जातीजातीत झालेला दुरावा आपल्याला संपवावा लागणार आहे. बीड जिल्ह्याला पुन्हा एकदा विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्याचं काम आपल्या सर्वांना करावं लागेल, असे आवाहन त्यांनी केले आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : **महेश पोपट रक्ताटे.** पोस्टल परवाना क्र. SRP/139/2023-2026/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/139/2023-2026 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# आ. जगतापांच्या सूचनेनंतर महानगरपालिका ॲक्शन मोडवर

## कापड बाजार, शहाजी रोड, गंज बाजारसह संपूर्ण बाजारपेठेत अतिक्रमणांवर कारवाई सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : स्टॉल लावण्यावरून अतिक्रमणधारक व दुकानदारांमध्ये झालेल्या वादानंतर आमदार संग्राम जगताप यांनी बाजारपेठेत व्यापाऱ्यांशी संवाद साधला. पोलिस प्रशासन व आमदार संग्राम जगताप यांच्या सूचनेनुसार बाजारपेठ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महानगरपालिकेने कारवाई सुरू केली आहे. बाजारपेठेत अतिक्रमणे थाटली जाऊ नयेत, यासाठी महानगरपालिकेचे स्वतंत्र विशेष पथक बाजारपेठेत नियुक्त करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

> रस्त्यावर अतिक्रमण केल्यास हातगाडी विक्रेते असो वा फेरीवाले किंवा दुकानदार असो त्यांचे साहित्य तत्काळ जप्त करण्यात येईल. दंड भरूनही हे साहित्य पुन्हा दिले जाणार नाही, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले. तसेच यापुढे बाजारपेठेत लक्ष ठेवण्यासाठी व अतिक्रमणांवर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र विशेष पथक नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावर अतिक्रमणे करू नये.
>
> – **यशवंत डांगे,** आयुक्त तथा प्रशासक

आ. संग्राम जगताप यांनी व्यापाऱ्यांशी संवाद साधल्यावर अतिक्रमणे कायमस्वरूपी हटवण्याची मागणी करण्यात आली. पोलिस प्रशासनानेही महानगरपालिकेला सूचना दिल्या होत्या. त्यामुळे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्वतः बाजारपेठेत जाऊन अधिकारी, कर्मचाऱ्यांना कारवाई सुरू करण्याचे आदेश दिले.

महानगरपालिकेचे पथक पाहताच अतिक्रमण धारकांनी पळ काढला. बाजारपेठेतील रस्ते रिकामे करण्यात आल्यानंतर दुकानदारांनी महानगर पालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी तंबी देऊन दुकानाबाहेर साहित्य न ठेवण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, आनंद धाम ते एलआयसी रोड पर्यंत रस्त्यावर लावल्या जाणाऱ्या ज्यूस सेंटरच्या गाड्या, रसवंतीच्या हातगाड्या महानगर पालिकेकडून हटवण्यात आल्या. ज्यूस सेंटरच्या दोन टपऱ्या जप्त करण्यात आल्या आहेत. अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, सुरेश इथापे यांच्या सूचनेनुसार माळीवाडा व बुरुडगाव रोड प्रभाग समिती कार्यालयाकडून संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली. क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे, अमोल कोतकर, अनिल आढाव यांच्या पथकाने ही कारवाई केली.



# श्रीक्षेत्र गोळवाडी–शिर्डी पदयात्रा दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर**: श्रीक्षेत्र गोळवाडी ते शिर्डी पदयात्रा दिंडी साई पालखी सोहळा सालाबादाप्रमाणे याही वर्षी दि.५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक ७ वाजता दक्षिणमुखी हनुमान मंदिर व ओमकारेश्वर महादेव मंदिर येथून दिंडीचे प्रस्थान होणार आहे.




तरी श्रीक्षेत्र गोळवाडी व रामनगर येथील साई भक्तांनी शनिवारी रोजी सकाळी ठीक सात वाजता दक्षिण मुखी हनुमान मंदिर ओम कारेश्वर महादेव मंदिराजवळ उपस्थित राहावे. गावातील जास्तीत जास्त साई भक्तांनी पदयात्रा दिंडी सोहळ्यात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री क्षेत्र गोळवाडी ते साईबाबा पदयात्रा दिंडी सोहळ्याचे आयोजन शैलेश सुराशे मित्र मंडळ गोळवाडी, रामनगर व गावातील ग्रामस्थांनी केले आहे.

# एमआयडीसीला शेतजमीन बचाव कृती समितीचा विरोध

## कर्जत तालुक्यातील कोंभळी परिसरात राजकीय नेत्यांना केली गाव बंदी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील खांडवी कोंभळी परिसरामध्ये एम आयडीसी मंजूर झाली आहे. या परिसरामध्ये शेतकऱ्यांची संमती न घेताच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ३२ (२) नुसार उपविभागीय अधिकारी यांच्या माध्यमातून नोटीस देण्यात आल्या असून, शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर कोणतीही पूर्वकल्पना न देता एमआयडीसीसाठी अधिग्रहण, अशी उताऱ्यावर नोंद ही करण्यात आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

### अंधारात ठेवून फसवल्याचा आरोप

या परिसरामध्ये एमआयडीसी होणार नव्हती. थेरगाव परिसरामध्ये समितीने पाहणी देखील केली होती. असे असताना त्या ठिकाणचा परिसर वन विभागाच्या लगत असल्यामुळे औद्योगिकीकरणासाठी नाकारण्यात आला आहे. आमच्या परिसराचा काहीही संबंध नसताना, आमच्या परिसरामध्ये एमआयडीसी साठी शेत जमीन अधिग्रहण करण्यात आली आहे. वास्तविक पाहता आमच्या शेतजमीन घेण्या अगोदर ग्रामसभा घेऊन त्यांची मान्यता घेण्याची आवश्यकता होती, गावामध्ये दवंडी देणे, ग्रामपंचायतीमध्ये नोटीस लावणे, स्थळ पाहणी करणे, याची सर्व माहिती परिसरातील शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता असताना, याबाबत कमालीची गुप्तता ठेवण्यात आली आहे.

यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी यामध्ये मोठ्या संख्येने महिला, पुरुष, युवक हे सर्वजण एमआयडीसी ज्या लाभक्षेत्रामध्ये होणार आहे, त्या परिसरामध्ये शेतजमीन बचाव कृती समितीच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. यामध्ये आमच्या काळ्या आईचा सौदा आम्ही करू देणार नाही व बागायची शेत जमिनीच्या परिसरामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये एमआयडीसी होऊ देणार नाही. आम्हाला एमआयडीसी नको, अशा घोषणा दिल्या.

यावेळी महिला शेतकरी अधिक आक्रमक झाल्या होत्या. जर कुणी आमची शेत जमीन घेण्यासाठी पुढे आला तर सर्वप्रथम आम्ही आमच्या जीवाचे बलिदान देऊ, सर्व वृद्ध मंडळी घरातील लहान मुले यांच्यासह आत्महत्या करू, मात्र आमची शेत जमीन



एमआयडीसी ला देणार नाही, अशी भूमिका महिलांनी घेतली. या शेतजमिनी आम्ही आमच्या पोटच्या मुला बाळासारख्या सांभाळाल्या आहेत.

कोणीही आमदार, मंत्री, स्थानिक नेते यांना गावामध्ये प्रवेश करून येणार नाही. असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी सुमन तापकीर, लता तापकीर, वैशाली तापकीर, शितल तापकीर, संगीता तापकीर, वंदना तापकीर, प्रमोद तापकीर, प्रदीप तापकीर, मिनीनाथ तापकीर, सुरेखा तापकीर, भारती गांगर्डे, मिरा तापकीर, निता तापकीर, सविता तापकीर, मनीषा तापकीर, अश्विनी तापकीर, राणी तापकीर, नंदा वायसे, अमित शेलार, भाऊसाहेब गोरखे,ऋषी गोरखे यासह आदी उपस्थित होते. यामुळे खांडवी कोंभळी एम आयडीसी देखील आता स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे अडचणीत सापडली आहे.

# लोणी येथील अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

## न्याय न मिळाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करणार : नातेवाईक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील खर्डा हद्दीतील लोणीत स्कुल बस आणि मोटरसायकलचा भीषण अपघात झाल्याची घटना दि. २४ मार्च २०२५ रोजी घडली होती. या घटनेत दुचाकीस्वाराचा दि. १ एप्रिल रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. स्पॉट पंचनामा, वाहन जप्त केले नाही व आरोपीस अटक न केल्याच्या निषेधार्थ मृतदेह संतप्त झालेल्या नातेवाईकांनी खर्डा पोलीस स्टेशनच्या आवारात ठेवल्याने मोठी खळबळ उडाली होती.

> पोलिसांनी ह्या तपासाकडे कमालीचे दूर्लक्ष केले आहे घटनास्थळी पंचनामा देखिल झाला नाही, पोलिसांचे व आरोपीचे आर्थिक देवाणघेवाण झाले असल्याचे मृतांच्या कुटुंबाचा आरोप आहे.



> पोलिसांच्या उलटसुलट उत्तरांमुळे मृताचे कुटुंब व वाकी ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत व न्यायाची मागणी करत आहेत, जर त्या स्कुल बस चालकावर कारवाई केली नाही. खुनाचा गुन्हा दाखल केला नाही, तर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या दालनात जाऊन उपोषण करण्याचा इशारा फिर्यादी व वाकीच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

यायबत सविस्तर माहिती अशी की, जामखेड तालुक्यातील खर्डा हद्दीतील शेंडकर वस्ती लोणी येथे मोटरसायकल आणि स्कुल बसच्या अपघाताची घटना घडली होती. या घटनेत यातील मृत तरुण नामे बंजरंग बाबासाहेब जगदाळे (वय ४५, रा. वाकी ता. जामखेड) हे गंभीर जखमी झाले होते. त्यामुळे त्यांना तात्काळ जाम खेड येथील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पण रुग्णाची स्थिती गंभीर असल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# मुस्लिमांचा बोधेगावात निषेध मोर्चा

## मस्जिदमध्ये स्फोट घडवून आणणाऱ्याला शासन करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी** : बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील अर्धमसला या गावात तीन दिवसांपूर्वी मध्यरात्री काही समाजकंटकांनी मुस्लिम समाजाच्या मस्जिद या धार्मिक स्थळावर जिलेटीनच्या कांड्या लावून स्फोट घडवून आणला होता. त्यामुळे या कृत्यामागील सूत्रधार आणि त्यांच्या सहकाऱ्याविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी शेवगाव तालुक्यातील बोधे-गाव येथील सकल मुस्लिम समाजाच्या वतीने गावातून निषेध मोर्चा काढून पोलिसांना लेखी निवेदन देऊन निषेध व्यक्त करण्यात आला.




बोधेगाव पोलिसात दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, अर्धमसला या गावात जाणूनबुजून घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटामुळे स्थानिक मशिदीचे मोठे नुकसान झाले असून, या कृत्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत. तसेच, या भ्याड हल्ल्यामुळे संपूर्ण समाजात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा हल्ला पूर्वनियोजित आणि समाजात द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने घडविण्यात आला असल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे या कृत्यामागील सूत्रधार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना त्वरित अटक करून त्यांच्या विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करावी. मौलाना माजीद, मुफ्ती रशीद, मौलाना मुश्किल, मुफ्ती अकबर, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाशबापू भोसले, युवा नेते सुनील खंडागळे अरुण झांबरे, शाहूराव खंडागळे, बबन कुरेशी, हाजी शफीक भाई, सामाजिक कार्यकर्ते बाबा पठाण, ग्रामपंचायत सदस्य महेश घोरतळे, बन्नूभाई शेख, प्रमोद मिसाळ, सादिक पठाण, मुनवर शेख, फिरोज बागवान, बिलाल पठाण, शाहरुख पठाण, श्रीधर भोंगळे आदी उपस्थित होते.

# वारकरी सांप्रदायाची ताकद फार मोठी : लोंढे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**भातकुडगाव फाटा** : वारकरी सांप्रदाय हा संत विचार व हिंदू संस्कृतीच्या विचारधारेवर चाललेला सांप्रदाय आहे. यामध्ये लहान थोर हा भेद नसून भक्तिपंथात सर्वांनाच ईश्वर प्राप्तीचा मार्ग संतांनी यापूर्वीच दाखवून दिला आहे. शुद्ध अंतकरणाने केलेली भक्ती ही भगवंत प्राप्तीपर्यंत घेऊन जातेच त्यासाठी थोर संतांनी घालून दिलेल्या भक्तीमार्गानेच जावे लागेल, अशा वारकरी सांप्रदायाची ताकद फार मोठी आहे, असे मत भारत महाराज लोंढे यांनी व्यक्त केले.

शेवगाव तालुक्यातील मजलेशहर मधील पुनर्वसित लिंभारीमध्ये हनुमंतरायाच्या दरबारात दत्तपीठ देवगड संस्थांचे महंत भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील तिसरे पुष्प गुंफताना महाराज बोलत होते. यावेळी महेश महाराज शेळके, मोहनदादा लोंढे, गणेश फटांगरे, विशाल पाचे, रितेश फटांगरे, गोरक्षनाथ साळुंके, नवनाथ मिसाळ, बाळासाहेब साळुंखे, ज्ञानदेव फासाटे, बबन शेळके, दिनकर फटांगरे, आप्पासाहेब जगधने, संजय फटांगरे, पांडुरंग लोंढे, नवनाथ रोकडे भाऊसाहेब गाडेकर यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

जीवनात उद्धार करावयाचा असल्यास नामजपाची साधना करून भक्ती हाच मार्ग सर्वच संतांनी सांगितला आहे. नाम जप करताना निस्वार्थ व शुद्ध भावनेचा असावा असा भाव परमेश्वर प्राप्ती पर्यंत जीवाला घेऊन जातोच, असे भारत महाराज लोंढे म्हणाले.

# जिल्ह्यातील सर्व दुकानांना मराठीत पाट्या लावा

## सचिन डफळ; मनसेचे सहाय्यक कामगार आयुक्त यांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अहिल्यानगर शहर व जिल्ह्यातील अनेक संस्था, दुकाने व आस्थापनांमध्ये स्वच्छ मराठी भाषेत पाट्या लावण्याबाबत पद्धतशीरपणे टाळाटाळ केली जात आहे. मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे तसेच नुकताच केंद्र सरकारने देखील मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे.



सर्व संस्था दुकाने व आस्थापनांना मराठी भाषेत पाट्या लावणे व व्यवहार करणे हे दुकान व संस्था अधिनियम १९४८ अन्वये बंधनकारक आहे. महाराष्ट्रातल्या मराठी माणसाच्या भाषेत पाट्या न लावता व व्यवहार न करता महाराष्ट्राचा व मराठी लोकांचा अपमान करत आहात, असे सचिन डफळ यांनी सांगितले.

अहिल्यानगर शहरात सर्व ठिकाणी मराठीत पाट्या असावेत, या मागणीसाठी मनसेच्यावतीने वतीने सहाय्यक कामगार आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, वाहतुक सेना शहराध्यक्ष अशोक दातरंगे, सहकार सेना शहराध्यक्ष गणेश शिंदे, उपशहराध्यक्ष तुषार शिंदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राच्या राजभाषेला तुच्छ मानण्याचा गंभीर गुन्हा काही संस्था, दुकाने व स्थापना करत आहेत। येत्या काही दिवसात शहरासह जिल्ह्यातील सर्व संस्था, दुकाने आस्थापना यांच्या पाट्या मराठीत न दिसल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना त्यावर कशी कारवाई करेल हे आपण पहालच, मग त्याच्या परिणामांची जबाबदारी पूर्णतः प्रशासनावर असेल हे लक्षात घ्यावे.

# आश्वी खुर्द महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कंपनीत वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधीने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र महविद्यालय, आश्वी खुर्दच्या तृतीय वर्ष विज्ञान (रसायनशास्त्र) व एम. एस्सी वर्गातील नऊ विद्यार्थ्यांची मॅकलिओड फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड नामांकित कंपनीत निवड झाले असल्याची माहिती प्राचार्य प्रा. देविदास दाभाडे यांनी माहिती दिली.




> नुकताच पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर (ता. राहाता) येथे मॅकलिओड फार्मास्युटिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची निवड चाचणीत दातीर योगेश, बोंबले संदीप, म्हसे शिवम, सांगळे आशुतोष, शिंदे शुभम, खामकर स्वामी, कुटे हरीराम, गायकवाड वैभवराज, पंडित आदेश या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. विशेष म्हणजे निकालापूर्वीच विद्यार्थ्यांच्या झालेल्या निवडीमुळे विद्यार्थ्या व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.
>
> **–प्रा. मोईन पटेल**

या निवडीबद्दल राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जि. प. मा. अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, डॉ. सुजयदादा विखे पाटील याचे सह प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, डॉ. प्रदीप दिघे, आश्वी महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. महेश खर्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. देविदास दाभाडे, तसेच महाविद्यालय विकास समिती सदस्य व सर्व प्राध्यापकासह विविध स्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे. निवडीसाठी प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. मोईन पटेल यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नेप्तीत हनुमान कथेसह, ज्ञानयज्ञास प्रारंभ

## आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन; ७ एप्रिलपर्यंत कथा चालणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील नेप्ती येथे श्रीराम नवमी निमित्त श्रीराम सेवा मंडळ व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिरासमोर हनुमान कथा संगीत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्रीराम विजयग्रंथ व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती रामदास फुले यांनी दिली आहे.

> सोहळ्याचे हे ३६ वे वर्ष आहे. ६ एप्रिल रोजी सकाळी राम जन्माचे किर्तन होईल. ७ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. रावसाहेब भागीनाथ होळकर यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे उद्घाटन आ. काशिनाथ दाते यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी प्रतिमा पूजन, ग्रंथ पूजन करून कथेला प्रारंभ करण्यात आला. कथा प्रवक्ते हभप संभाजी महाराज शिंदे बोधेगाव हे आहेत. ही कथा ७ एप्रिलपर्यंत रात्री ८ ते ११ या या वेळेत होणार आहे.

या कथेला तबला जितेंद्र महाराज आमले आळंदी, सिंथ वादक बळीराम महाराज गिरी, साऊंड सिस्टिम तुषार भुजबळ तर बासरी वादक बाबासाहेब भोर यांची साथ संगत असणार आहे.



यावेळी श्रीराम सेवा मंडळाचे अध्यक्ष बबन फुले, उपाध्यक्ष बाळासाहेब होळकर, रामदास फुले, माजी सरपंच दिलीप होळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, उद्योजक दिलीप दाते, बापू सोनवणे, बबन बेल्हेकर, प्रा. एकनाथ होले, बाळासाहेब बेल्हेकर, मारुती कावरे, चंद्रकांत खरमाळे, बबन शिंदे, अशोक गवळी, देवराम जपकर, सुरेश चत्तर, जालिंदर शिंदे, एकनाथ होळकर, श्रीनिवास महाराज जपकर, बाबासाहेब जाधव, विष्णू गुंजाळ, अशोक जपकर, बाबासाहेब होळकर, उमर सय्यद, योगेश कुलकर्णी, बंडू रावळे, भानुदास फुले, राजू फुले, राजाराम जपकर श्रीराम सेवा मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोहळ्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण झाले असून संपूर्ण गाव भक्तीमय झाला आहे. हा सोहळा गावकऱ्यांसाठी मोठी पर्वणी ठरत आहे. सोहळ्यानिमित्त मंदिर परिसर स्वच्छ करून मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

# हमखास यश मिळविण्यासाठी संपादन महत्त्वाचे

## महेंद्र खोलम; विखे पाटील अभियांत्रिकी पारितोषिक वितरण समारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात यश मिळविण्यासाठी नवनवीन संधी शोधाव्यात शिक्षण घेत असताना नवीन प्रकल्प उभे करून रोजगार निर्मिती कशी होईल, त्या दृष्टीने प्रयत्न करावेत. आपल्या अनुभवातून विविध क्षेत्रात पदार्पण करून स्वतःचा व्यवसाय कसा विकसित करता येईल. त्याला महत्त्व देत सध्याच्या अनिश्चितेच्या युगात हमखास यश संपादन करायचं असेल तर आपल्या जीवनात बदल करीत रहाणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन माजी विद्यार्थी व महेंद्र टेक्नॉलॉजीज चे सीनियर मॅनेजिंग पार्टनर महेंद्र खोलम यांनी केले आहे.



विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लॉरीझ नूडसेनचे मॅनेजिंग डायरेक्टर इंजिनीअर अरविंद पारगांवकर, विखे पाटील अभियांत्रिकीचे १९९३ बॅचचे माजी विद्यार्थी मेकनिकल इंजिनीअर महिंद्रा टेक्नॉलॉजीचे मॅनेजिंग पार्टनर महेंद्र खोलम, २००६ बॅचचे आय. टी. इंजिनीअर किरण खिलारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त ॲड. वसंतराव कापरे, प्रभारी सेकेटरी जनरल डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर टेक्निकल सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ. उदय नाईक, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. उदय नाईक यांनी प्रास्तविकात महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धा तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्याचबरोबर महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध शाखांची माहिती दिली.

खिलारी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणी सांगितल्या तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ए. आय. च्या युगात नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन त्याचा उपयोग आपले भवितव्य घडवण्यासाठी कसा करता येईल याचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर सध्या उपलब्ध असलेले विविध तंत्रज्ञानाविषयी माहिती सांगितले.

### विद्यार्थ्यांनी पंचतंत्र अवलंबावे

प्रमुख पाहुणे इंजिनीअर अरविंद पारगांवकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बुध्दिमत्ता, लक्षकेंद्रीकरण, जागरुकता, चांगले विचार आणि आत्म विश्वास या पंचतंत्राचा जर विद्यार्थ्यांनी जीवनात उपयोग आणून प्रयत्न करत राहिल्यास कुठलेही काम व्यवस्थित पूर्णत्वास जावून लक्ष्य प्राप्त करु शकता असे सांगितले. विविध विभागांतील प्रथम क्रमांक मिळविलेले विद्यार्थी, विविध खेळामध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना तसेच स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

# श्रीरामपूर नगरपालिकेसमोर धरणे आंदोलन सुरू

## सफाई कामगारांच्या वारसांना सेवेत कायम करावे; मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपालिका आरोग्य विभागातील आस्थापनेवरील कायम रिक्त पदावरील सफाई कामगारांच्या वारसांना लाड -पागे समितीच्या शिफारशीनुसार सेवेत कायम करावे, या मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका कामगार कर्मचारी यांच्या वतीने कॉ. जीवन सुरुडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिका समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे

लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार कामगारांच्या वारसांना सेवेत घेण्याची पद्धत गेली अनेक वर्ष सुरू असून शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने लाड -पागे समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने सफाई कामगारांचे वारसा हक्काच्या अंमलबजावणी बाबत २४ फेब्रुवारी २०२३ शासन निर्णय निर्गमित केला आहे. तरी शासन निर्णयाच्या अनुषंगाने उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगर यांनीही ८ जानेवारी २०२५ रोजी या शासन निर्णयाची तातडीने काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश दिलेले आहे. तरीही श्रीरामपूर नगरपालिका प्रशासनाकडून सदर कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्यासाठी टाळाटाळ करण्यात येत असल्याने तसेच कोर्ट आदेशाचे पालन होत नसल्याने धरणे आंदोलन सुरू आहे.



### मंत्री विखेंशी चर्चा करणार: दिनकर

या बेमुदत आंदोलनासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन भाऊ दिनकर यांनी आंदोलन कर्ते यांची भेट घेऊन आपल्या कामगारांच्या प्रश्नाबाबत प्रयत्नशील असून पालकमंत्री महोदय नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा विनिमय करून येणाऱ्या दोन ते तीन महिन्यात निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.

याप्रसंगी शहराध्यक्ष मारुती बिंगले, बंडू कुमार शिंदे, हंसराज बत्रा, सतीश सौदागर, अक्षय गाडेकर, किराणा कर्नावट, आनंद बुधेकर, महेश रुपेश हरकल, भैय्या भिसे, राहुल पांढरे, पूजाताई चव्हाण, पुष्पाताई हरदास, मिलिंद कुमार साळवे, गणेश करडे, विजय आखाडे उपस्थित होते.

# वेदामध्ये भारताचे नाव हे देव भुमी

## मंगेश मनकर; श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रगट दिन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** भरत राज्याच्या प्रश्चात देशाचे नाव हे भारत झाले. वेदामध्ये भारताचे नाव हे देव भुमी असुन याभुमीवर साक्षात परमेश्वारचे आवतार झाले. विशेष बाब म्हणजे या पृथ्वीवर जेवढे ही देवानी आवतार घेतला ते सर्व भारतातच झाले असुन तुकारामांच्या १५० पिढ्या ह्या विष्णुदेवाच्या सेवेत होत्या. त्यमुळेच तुकारामचा जन्म पृथ्वीवर झाल्याचे मंगेश मनकर यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र आश्वी बुद्रुक (ता.संगमनेर) येथे श्री स्वामी समर्थ महाराजाचा प्रखट दिनानिमित्त



मार्गदर्शन करतांना मंगेश मनकर बोलत होते. यावेळी उपसंरपच बबनराव शिंदे, नामदेव होडगर, दत्तात्रय पवार, नानासाहेब निघुते, नामदेव ताजणे, तान्हाजी गायकवाड, लक्ष्मण होडगर, एकनाथ ताजणे, संतोष रासने, सोमनाथ ताजणे यासह महिला पुरुष सेवेकरी उपस्थित होते.

मंगेश मनकर म्हणाले की, परमेश्वर हा जन्म घेत नसुन तो आवतारूपी पृथ्वीवर येतो. भक्त होण्यापेक्षा सेवेकरी होण्यामध्ये जास्त पुण्य आहे. आपण आपला जन्म हा हिंदुस्थानात झाल्यामुळे आपण फार भाग्यशाली आहोत. आपल्याकेड जी सहिसुत्रा आहे ती इतर देशाकडे नाही. अमेरीका, इंग्लंड, फान्स किंवा पाकिस्तान या देशाचा कधी ही माता असा उल्लेख होत नाही मात्र भारताकडे मात्रुत्व आहे. त्यामुळे भारताला भारत माता असा उल्लेख आढळतो. स्वामी सेवेकरी हे खरेच भाग्यशाली आहे कारण त्याच्या बरोबर गुरूमाऊली आहे.

# श्रीस्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** दिंडोरी प्रणित मार्गाच्या वतीने सोनई येथील श्रीस्वामी समर्थ आध्यात्मिक केंद्रात स्वामी प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात साजरे करण्यात आले. यज्ञमंडपात झालेल्या हवनयुक्त स्वामीचरित्र पारायण सोहळ्यास सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिंडोरी प्रणित मार्गाचे प्रमुख गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकट दिनानिमित्त सकाळी आठ वाजता दरबारात अभिषेक व पूजन झाल्यानंतर भुपाळी आरती झाली. येथील यज्ञमंडपात हवनयुक्त स्वामीचरित्र्याचे एक पारायण झाले. षोडशोपचार अभिषेक व त्यानंतर महानैवद्य आरती झाली. अकरा ते बारा वाजेपर्यंत मंत्र व स्तोत्र पठण झाल्यानंतर सामुहिक काला महाप्रसाद वाटप करण्यात आला. दरबारात उपस्थित सेवेकरी व भक्तांना सणवार,व्रत वैकल्ये तसेच हॉस्पिटल निर्माण, ग्रामअभियान,विभाग माहिती,सिद्ध मंगल पुजन माहिती,स्वामी समर्थ मार्गाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम व औदुंबर प्रदक्षिणा झाल्यानंतर साडेसहा वाजता नैवेद्य आरती व प्रसाद वाटपाने सोहळ्याची सांगता झाली.


# करंजीत जंगलाला आग; वन्य प्राण्यांना झळ

## आग लागते का लावली जाते? ग्रामस्थांपुढे आहे मोठा प्रश्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील वनविभागाच्या जंगलाला मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घोरदरा पाझर तलाव परिसरात आग लागली. या आगीने काही वेळातच रुद्ररूप धारण केल्याने जंगलातील अनेक छोटे मोठे झाड झुडुप सरपटणारे प्राणी पशुपक्षी यांना देखील या आगीच्या झळा सोसाव्या लागल्या.

मंगळवारी रात्री लागलेल्या आगीमध्ये वनविभागाचे नेमकी किती हेक्टर क्षेत्र जळून खाक झाले? याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न देखील केला असता माहिती घेऊन सांगतो, असे ते म्हणाले असले




तरी रात्री लागलेल्या आगीमध्ये वन विभागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक झाडांची राख रांगोळी झालेली आहे. दरवर्षीच करंजी दगडवाडी या परिसरातील जंगलाला आग लागून मोठ्या प्रमाणात वनविभागाचे नुकसान होत आहे. त्यामुळे आग लागते का? लावली जाते. याबाबत देखील आता वनविभागाने सखोल चौकशी करून याबाबतची वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. वारंवार अशा घटना घडत असल्यामुळे निसर्गाचं आणि जंगलाचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. मंगळवारी रात्री आग लागल्याची माहिती करंजी गावच्या काही ग्रामस्थांनी वनविभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना दिल्यानंतर वनविभागाचे कर्मचारी काही वेळात आग विझवण्यासाठी त्या ठिकाणी पोहोचले. रात्री एक वाजण्याच्या सुमारास ही आग विझवण्यात वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसह निसर्गप्रेमींना यश आले. पर्यावरण संवर्धन व संरक्षण चळवळीचे प्राध्यापक अमित गायकवाड, संदिप राठोड, पर्यावरण मित्र सुनिल मरकड, प्रा. सुर्यकांत काळोखे, गणेश कांबळे, चंद्रकांत ऊदागे, संतराम साबळे, सचिन चव्हाण, विजय बर्डे, छत्रपती युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विवेक मोरे, रणजीत अकोलकर, शुभम मुटकुळे, निखिल दुधाने, कारभारी शिंदे यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला.

# श्रीराज घोरपडे याचे नवोदयमध्ये यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील रयत शिक्षण संस्था संचलित स्व. सौ. एस. के. सोमैय्या प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्रामधील विद्यार्थी श्रीराज युवराज घोरपडे याने जवाहर नवोदय परीक्षा २०२४ मध्ये यशस्वी होत घवघवीत यश संपादन केले आहे.श्रीराज यास वर्गशिक्षक जालिंदर जाधव, विषय शिक्षक नानासाहेब ताके, मेघा पवार, महेश डाळींबकर तसेच स्पर्धा परीक्षा प्रमुख अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले.श्रीराज याच्या यशाबद्दल रय शिक्षण संकुलाच्या अध्यक्षा मीनाताई जगधने, विद्यालयाच्या मु‘याध्यापिका पैठणे यांनी अभिनंदन केले असून तो येथील प्रसिद्ध गायत्री ट्रेडर्स चे मालक युवराज व स्नेहा घोरपडे यांचा मुलगा असून निलेश घोरपडे यांचा पुतण्या आहे. त्याचे समर्थ ग‘ुप नेवासा रोड मित्र मंडळाने अभिनंदन केले आहे.



# प्रत्येकाने जल संवर्धनाची कास धरावी: डॉ. विठ्ठल शिर्के

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** सिंचनाचे पाणी हे कोरडवाहू विभागात तारक व बागायत क्षेत्रात अतिरिक्त वापराणे मारक होऊ शकते, त्यासाठी पाण्याचे काटकसरीने नवीन आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर केल्यास जामिनी क्षारपड होणार नाही व विविध पिकांचे शाश्वत उत्पादन घेता येईल. जागतिक जल दिनानिमित्ताने प्रत्येकाने जल संवर्धनाची कास धरावी, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले.

महात्मा फुले विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वित जलसिंचन व्यवस्थापन प्रकल्पाने जागतिक जल दिनानिमित्ताने अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण व कृषि साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन मु.पो. गुंजाळे (ता. राहुरी) या गावामध्ये करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. विठ्ठल शिर्के बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके होते. यावेळी गुंजाळे गावचे सरपंच सीमा नवले, कार्यक्रमाचे आयोजक वरिष्ठ मृदशास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे व जलसिंचन निचरा अभियांत्रिकीचे शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद पोपळे उपस्थित होते.याप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शनात करतांना डॉ. प्रशांत बोडके म्हणाले की, आपण सिंचनासाठी पाणी वापरतांना त्याचा ताळेबंद ठेवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी पाण्याची बचत करण्यासाठी व उत्पादन वाढविण्यासाठी ठिबक, तुषार, रेन पाईप, या सुक्ष्मसिंचन पध्दतींचा वापर करावा. पाणी वाचविणे म्हणजेच पाणी कमविणे. डॉ. अनिल दुरगुडे यांनी जागतिक जल दिनानिमित्ताने हिमनद्याच्या संवर्धनाबाबत माहिती सांगितली व पाण्याचे पृष्ठभागावरील व पृष्ठभागाखालील पाण्याच्या संवर्धना विषयी व नैसर्गिक भूगर्भातील पाणी पातळी वाढविण्याविषयी माहिती दिली.

# सुदर्शन नागरी पतसंस्थेस ५१ लाखाचा नफा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील नागरीक पतसंस्था चळवळीत अग‘गण्य असलेल्या सुदर्शन नागरी सहकारी पतसंस्थेस सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये ५१ लाख रुपये निव्वळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष देविदास चव्हाण व उपाध्यक्ष भूषण साठे यांनी दिली.



उद्योग व्यवसायामध्ये व सहकार क्षेत्रात पतसंस्था चळवळीत तसेच बँकांमध्ये स्पर्धात्मक परिस्थितीस सामोरे जावून सुदर्शन नागरी पतसंस्थेच्या संचालक मंडळाने व व्यवस्थापक व कर्मचारी यांनी सभासद, ठेवीदार व कर्जदार यांना सेवा देत संस्थेमध्ये एक वेगळा विश्वास निर्माण केल्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती चांगली असून प्रगती पथावर असल्याचे अध्यक्ष देविदास चव्हाण यांनी स्पष्ट केले.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ५१ लाख रुपये निव्वळ नफा मिळवित संस्थेची ५ कोटी ६० लाखांची गुंतवणूक केली असून ठेवी २० कोटी रुपयांच्या असून १३ कोटी ८४ लाखाचे तारण कर्ज वितरण केले आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल ८८ कोटी ५५ लाख रुपये असून स्वनिधी २ कोटी ३३ लाख, मालमत्ता १ कोटी ८२ लाख रुपये आहे.

पतसंस्थेने स्वामालकीच्या नेवासा रोडवरील प्रशस्त नवीन जागेत स्थलांतर केले असून सभासद व ग‘ाहकांसाठी लॉकर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. पतसंस्था सभासदांना दरवर्षी तेरा टक्के लाभांश वितरण करीत असून संस्था आर्थिक उलाढालीबरोबरच सामाजिक उपक‘मही राबवित आहे.पतसंस्थेच्या प्रगतीत उपाध्यक्ष भूषण साठे, संचालक, पदाधिकारी, कर्मचारी, दैनंदिन ठेव प्रतिनिधी, कर्जदार यांचे सहकार्य लाभले असून सहाय्यक निबंधक व लेखा परीक्षक यांचे मार्गदर्शन लाभ असल्याचे अध्यक्ष देविदास चव्हाण यांनी सांगितले.

# निघोज पतसंस्थेला साडेपाच कोटींचा नफा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** सोमवार दिनांक दि ३१ मार्च या २०२४ - २५ या आर्थिक वर्षात बाबासाहेब कवाद निघोज ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ५५ लाख , ५ हजार रुपयांचा नफा झाला आहे , अशी माहिती संस्थेचे चेअरमन वसंतराव कवाद सर यांनी दिली. कवाद म्हणाले की , संस्थेच्या मार्च २०२५ अखेर २६९ कोटी ४५ लाख ८९ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे भांडवल ६ कोटी ७४ लाख ३६ हजार रुपये आहे. संस्थेला येणे कर्ज १६९ कोटी ७२ लाख ८७ हजार रुपये असून राखीव व इतर निधी रु. ३८ कोटी ५४ लाख ६८ हजार रुपये आहे. संस्थेची गुंतवणूक १६० कोटी ५१ लाख असून कायम मालमत्ता ४ कोटी ७७ लाख ४६ हजार रुपये आहे. संस्थेला ५ कोटी ५५ लाख रुपयांचा नफा झालेला असून ४३९ कोटी १८ लाख ७६ हजार रुपयांचा व्यवसाय केला आहे. संस्थेने वाटलेल्या कर्जाची थकबाकी अवघी शेकडा २. ८५ टक्के असून नेट एनपीए शून्य आहे.



संस्थेचे व्हाईस चेअरमन नामदेवराव थोरात यांनी सांगितले की , संस्थेने स्थापनेच्या कालावधी पासून सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली आहे. सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदी, वाहन खरेदी, गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगार यांना आर्थिक प्रगती करता यावी , यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.

# कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालय आणि द युनिक अकॅडमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेला ‘स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व पुस्तक प्रदर्शन’ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन मिळाले.

‘द युनिक अकॅडमी’, पुणे येथील व्याख्याते दिनेश ताठे यांनी बोलताना स्पर्धा परीक्षांच्या बदलत्या स्वरूपाबद्दल सखोल विवेचन केले. आणि विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा का द्यावी, यावर सुस्पष्ट मार्गदर्शन दिले. दिनेश ताठे यांनी सरकारी नोकरीचे महत्त्व, सामाजिक प्रतिष्ठा, समाजसेवेसाठी योगदान, आणि प्रगतीची दिशा याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय नगरकर होते. त्यांनी बोलताना स्पर्धा परीक्षांच्या महत्त्वा सांगितले आणि यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे उदाहरण देऊन त्यांना मार्गदर्शन केले. तसेच, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा उपयोग सकारात्मक दृष्टिकोनातून करावा, यावर त्यांनी विशेष भर दिला.कार्यक्रमात द युनिक अकॅडमीचे समन्वयक चंद्रकांत खराडे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. संदीप गोंदके यांनी केले, तर आभार डॉ. दिग्विजय कुंभार यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. रामकृष्ण काळे यांनी केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, मार्गदर्शक शिक्षक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





# चविष्ट सातू ड्रिंक

दोस्तांनो, हॉस्टेलमध्ये सारखी लगबग सुरु असते. परीक्षेच्या काळात तर तोंड वर करायलाही वेळ नसतो. अशा वेळी खाण्यापिण्याकडे थोडं दुर्लक्षच होतं. मेसमधलं जेवण असलं तरी सकाळचा नाश्ता टाळला जातो. मात्र भरपूर अभ्यास करायचा तर दिवसाची सुरूवात हेल्दी ब्रेकफास्टने व्हायला हवी. काही शिजवायला आपल्याकडे वेळ नसतो. अशा वेळी सातूच्या पिठापासून झटपट नाश्ता बनवता येईल. भाजलेल्या चण्याच्या डाळीपासून हे पिठ बनवलं जातं. त्यामुळे यात भरपूर प्रथिनं असतात. यातल्या प्रथिनांमुळे दैनंदिन कामं, अभ्यास, कॉलेज अशा धावपळीत थकवा येणार नाही. मग सातूपासून काय बनवता येईल हे पाहू या.

**झटपट रेसिपी**

**साहित्य :** सातूचं पिठ, लिंबू, साखर, मीठ, जिरेपूड इत्यादी...

**कृती:** गरम पाणी घ्या. त्यात दोन चमचे सातूचं पिठ घाला. गोड आवडत असेल तर साखर घाला. नीट ढवळून घ्या. साखर नको असेल तर मीठ, मिरीही घालता येईल. यामुळे मस्त खारं पेय तयार होईल. यात चिमूटभर जिरेपूड घाला आणि लिंबू पिळा. छानसा चविष्ट बेकफास्ट तयार होईल. एखाद्या दिवशी खूप धावपळ असेल तर पोटभरीचा आणि झटपट होणारा हा नाश्ता करायला हरकत नाही.

# रवीचा शिकवणीपासून वायुदलापर्यंतचा प्रवास...

**स्वप्नं बघण्याला मर्यादा नसते. कोणीही स्वप्न बघू शकतं. पण ती सत्यात उतरवण्यासाठी धैर्याची आवश्यकता असते. स्वप्नांवर विश्वास ठेवून त्यांना सत्यात उतरवण्यासाठी प्रचंड परिश्रम करावे लागतात. खडतर परिस्थितीशी सामना करावा लागतो. प्रतिकूल काळाला न जुमानता अभ्यास करून रवि कश्यपने घवघवीत यश प्राप्त केले. जाणून घेऊ या रविचा प्रवास...**

**अचिव्हर**

असे म्हटले जाते की, त्याच लोकांचे स्वप्न पूर्ण होतात, जे कठोर परिश्रम करुन जिद्दीने त्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेतात. ग्रामीण भागातील असे विद्यार्थी जेव्हा यशस्वी होतात, तेव्हा त्यांचे संपूर्ण आयुष्य बदलून जाते. रवि कश्यप या तरुणाची कहाणीही अशीच आहे. मजूराचा मुलगा असलेला रवि कश्यप याने आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर मेहनत केली आणि शेवटी आज त्याचे स्वप्न पूर्ण झाले. रवि कश्यप हा मूळचा फिरोजाबाद येथील मक्खनपूरच्या बरामई गावातील रहिवासी आहे. त्याचे आयुष्य खूप संघर्षमय राहिले आहे.

याबाबत बोलताना त्याने सांगितले की, त्याचे वडील एका काचेच्या कारखान्यामध्ये काम करतात आणि आपल्या कुटुंबाच उपजीविका भागवत आहेत. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने फी भरायला खूप त्रास झाला. त्याचे बालपणापासूनच स्वप्न होते की, त्याने डिफेन्समध्ये नोकरी करावी. त्यामुळे त्याने हवाई दलाच्या तयारीसाठी फिरोजाबादच्या नौदल संरक्षण अकादमीत प्रवेश घेतला.

रविच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे त्याने मुलांची शिकवणीही घेतली. त्याने आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कोचिंग संस्थेत प्रवेश घेतला. त्याला कोचिंगला जाण्यासाठी रोज पहाटे ४ वाजता घरातून निघावे लागायचे. कोचिंगला जाण्यासाठी त्याला १५ किमी सायकल चालवावी लागायची. अनेक दिवस अशाप्रकारे त्याने मेहनत केली आणि शेवटी त्याला यश मिळाले. मेहनतीला फळ मिळाले आणि त्याची भारतीय वायुसेनेत निवड झाली, अशी माहिती त्याने दिली.

कोचिंग संस्था चालवणारे मयंक शर्मा यांनी सांगितले की, त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यामुळे त्यांनी त्याला फ्रीमध्ये कोचिंग देण्याचे आश्वासन दिले होते. यानंतर रविने अत्यंत मेहनत करुन आज हे यश मिळवले. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते त्यांच्याकडून फी घेत नसल्याचे त्यांनी सांगितले. रविचीही परिस्थिती तशीच होती. आज त्याची निवड झाल्यानंतर मला विशेष आनंद होत आहे, असे ते म्हणाले.



# जोश

**फंडू एसएमएस**


कुछ सिखना ही है,
तो आखों को पढना सिखलो,
वरना लफ्जों के मतलब तो
हजारो निकाल लेते हैं।

बंदा नहीं है कोई टक्कर का
आज की तारीख में,
इसलिए लफ्ज कम पड जाते है,
हमारी तारिफ में।

हमारे लिए उनके दिल में
चाहत ना थी।
किसी खुशी में कोई
दावत ना थी।
हमने दिल उनके
कदमों मे रख दिया।
पर उन्हें जमीन देखने की
आदत ना थी।

**सोशल मीडिया**

## प्रोटेक्ट युवर अकाउंट



सोशल मीडिया अकाउंट्सच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी लागते. त्यातही फेसबुकवरचा डाटा हॅक होण्याची शक्यता असल्याने त्याच्या सेटिंग मेनूमध्ये जाऊन 'प्रायव्हसी सेटिंग्ज' ऑन करा. यामुळे दुसरं कोणी तुमचं खातं बघू शकणार नाही. प्रोफाईलमध्ये अगदी जुजबी माहिती द्या. 'इन्स्टाग्राम' ॲप ओपन करून सेटिंग्ज, 'प्रायव्हसी अँड सेक्युरिटी' ऑप्शनमध्ये जाऊन 'प्रायव्हेट सेक्युरिटी' ऑन करा.

**हाऊ टू?**

## एडिट युवर व्हिडिओ



दोस्तांनो, फिरायला गेल्यावर आपण त्या ठिकाणांचे व्हिडिओ तयार करतो, फोटो काढले जातात. छोट्या क्लिप्स तयार केल्या जातात. हे सगळं एकाच साच्यात बसवता येईल. या काळातल्या भटकंतीचा मिनी मूव्ही तयार करता येईल. एडिटिंगचं कौशल्य आत्मसात करून तुम्ही हा मिनी मूव्ही तयार करू शकता. यासाठी व्हिडिओ एडिटिंग ॲप डाउनलोड करून घ्या. विंडोजसाठी मायक्रोसॉफ्टचं 'मूव्ही मेकर १०', 'अँड्रॉइड'साठी 'सायबर लिंक ॲक्शन डायरेक्टर', 'आयओएस'साठी 'आय मूव्ही' तसंच 'ॲडॉब प्रिमियर' अशा ॲप्सची निवड करा आणि आपल्या आठवणी नीट जपून ठेवा.

# स्टायलिश हेन्ले टी शर्ट

**फॅशन पॅशन**

बरेचदा तुमचे सगळे टी शर्ट धुवायला किंवा इस्त्रीला गेलेले असतात. घरात असलेला एखादा टी शर्ट घालण्याची इच्छा नसते. अशा वेळी हेन्ले टी शर्ट तुमच्या मदतीला येऊ शकतात. हेन्ले टी शर्ट हा स्टायलिंगचा सर्वोत्तम पर्याय आहे. कॉलर नसलेला हा टी शर्ट खूपच छान दिसतो. हेन्ले वेगवेगळ्या पद्धतीने स्टाईल करता येतो. तुम्हालाही हेन्ले टी शर्ट आवडत असेल तर त्याच्या स्टायलिंग टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील.

✻ एखाद्या प्रसंगी फारसं कॅज्युअल आणि फॉर्मल दिसायचं नसेल किंवा डेटला जायचं असेल तर ग्रे रंगाचा हेन्ले टी शर्ट घाला. त्यासोबत नेव्ही ब्लू चिनोज आणि ब्लेझर कॅरी करा. ट्रेंडी ऑक्सफर्ड घाला. तुम्ही कोणत्याही ऑकेजनची शान ठराल.



✻ व्हाईट हेन्ले टी शर्ट आणि निळी जीन्स हे कॉम्बिनेशन हिट ठरेल. जास्तच बिनधास्त दिसायचं असेल तर वापरलेली, मळलेली जीन्स कॅरी करा.

✻ हेन्ले टी शर्टवर जॅकेटही शोभून दिसतं. डेनिम, लेदर यापैकी कोणतंही जॅकेट चांगलं दिसेल. ब्लॅक हेन्ले टी शर्टवर जॅकेट शोभून दिसतं

✻ हेन्ले टी शर्टवर जॅकेटही शोभून तुम्ही मोनोक्रोम लूकही कॅरी करू शकता. निळ्या रंगाचा हेन्ले टी शर्ट घाला. त्यासोबत निळी ट्राउझर घाला. ही ट्राउझर आरामदायी किंवा बॅगी असावी. आवडत असेल तर सस्पेंडर स्टाईल करता येईल.

✻ हेन्ले टी शर्टसोबत ॲक्सेसरीज खुलून दिसतील. साधी मेटलची चेन, निळ्या मण्यांचे ब्रेसलेट, ट्रेंडी घड्याळ असं बरंच काही कॅरी करता येईल.

दोस्तांनो, बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे टी शर्ट मिळतात. पण हेन्ले टी शर्टमध्ये तुम्ही जास्त खुलून दिसता. तरुण दिसण्यासाठीही तुम्ही हेन्ले टी शर्ट घालू शकता. हेन्ले खूप साधा वाटला तरी खूपच ट्रेंडी टी शर्ट आहे. त्यामुळे काळा, पांढरा, निळा, लाल या रंगांचे हेन्ले टी शर्ट तुमच्याकडे असायला हवेत.

# लवकर उठून व्यायाम केल्याने...

**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, बऱ्याचजणांना सकाळी उठून व्यायाम करण्याचा कंटाळा येतो. पहाटे उठायचं, आवरायचं आणि जीममध्ये जायचं हे रूटिन अनेकांना नकोसं वाटतं. पण पर्याय नसल्याने बरेचजण सकाळी उठून जीममध्ये जातात. मात्र सकाळचा व्यायाम जास्त प्रभावी असल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. रात्रीची सात ते आठ तासांची झोप मिळाल्याने शरीर ताजंतवानं झालेलं असतं. त्यामुळे व्यायामाचे सर्वाधिक लाभ मिळवायचे असतील तर सकाळी उठायला सुरूवात करा. सकाळी बिछान्यात पडून राहण्याची सवय असणाऱ्यांना या टिप्स नक्कीच मदतकारक करतील.

✻ जीममध्ये जात असाल तर सगळी तयारी रात्रीच करून ठेवा. तुमची बॅग भरुन ठेवा. यामुळे सकाळी आवराआवरीला जास्त वेळ लागणार नाही आणि गडबड होणार नाही.

✻ वेळेत उठण्यासाठी रात्री लवकर झोपायला हवं. सकाळी कोणी उठवणारं नसेल तर फोनमध्ये अलार्म लावून घ्या. पाच ते दहा मिनिटांच्या अंतराने चार ते पाच अलार्म लावा. यामुळे वैतागून का होईना, तुम्हाला उठावं लागेल.


✻ सकाळी उठल्यावर सर्वात आधी पाणी प्या. शक्यतो गरम पाणी प्यायला हवं. जीमला जायचं असलं तरी या नियमात कोणताही बदल करू नका. सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी ग्लासभर गरम पाणी प्या. जीममध्ये जोशात व्यायाम करायचा असेल तर जाताना ब्लॅक कॉफी प्या.

✻ तंदुरूस्तीचं महत्त्व तुम्ही जाणताच. हे ध्येय साध्य करायचं आहे हे मनावर ठसवत रहा. स्वयंप्रेरणा सर्वात महत्त्वाची आहे हे लक्षात ठेवा. मग काय दोस्तांनो, सकाळी लवकर उठायला सुरूवात करायची ना?



**व्हॉट्स न्यू?**

## अनोखे नवे फीचर!



व्हॉट्सॲप वापरकर्त्यांसाठी आता नवीन फिचर आणले आहे. व्हॉट्सॲप स्टेटस कॉंटॅक्ट मेन्शनचा ऑप्शन देण्यात आले आहे. या नव्या फिचरला आता बिटा युजर्ससाठी आणण्यात आला आहे. या नव्या फिचरच्या मदतीने तुम्ही व्हॉट्सॲप युजर्सना स्टेटसमध्ये मेन्शन करावे लागेल. त्यामुळे ज्या व्यक्तीने हे स्टेटस पाहावे त्यांना तुम्ही स्टेटस लावल्याचा नोटीफिकेशन जाणार आहे. हे नवीन फिचर व्हॉट्सॲप अँड्रॉइड २.२४.६.१९ बिटा व्हर्जनमध्ये समाविष्ट केले आहे. आपण बिटा व्हर्जन गुगल प्ले स्टोअर वरून डाऊनलोड करू शकता. स्टेबल व्हर्जनमध्ये हे फिचर केव्हापासून लागू होईल याची माहिती अजून देण्यात आलेली नाही.

# या रागाचं काय करू?

**मॅच मेकिंग**



मी २६ वर्षांची नोकरदार तरुणी असून सध्या मला एक समस्या भेडसावत आहे. मला चटकन राग येतो. लोकांवर मी अक्षरश: खेकसत असते. तसं पहायला गेलं तर राग येण्याचं कोणतंही कारण नसतं. पण अगदी छोट्या छोट्या गोष्टींवरून मी चिडते. मात्र नंतर भावूक होते. एक व्यक्ती म्हणून मला माझ्यात खूप बदल जाणवतात. काही महिन्यांपर्यंत मी अगदी आनंदी आणि खेळकर होते. सकारात्मक विचार करायचे. माझ्या आयुष्यात विशेष अशा समस्या नसल्या तरी छोट्या छोट्या गोष्टींनी उदास होतं. या मानसिक स्थितीवर कशी मात करू? याचा परिणाम माझ्या भविष्यातल्या वैवाहिक आयुष्यावर होईल का?

**उत्तर :** सर्वात महत्त्वाचं म्हणजे तू काही वैद्यकीय चाचण्या करून घे. हार्मोन्सच्या बदलांमुळे मूडमध्ये चढ–उतार होतात. तुझ्या जीवनशैलीत झालेल्या बदलांची नोंद कर. तुझ्यावर कामाचा खूप ताण आहे का, सततच्या दगदगीमुळे असं होतं का, हे ही जाणून घेण्याचा प्रयत्न कर. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी समुपदेशकाची मदत घे. मेडिटेशन, योगामुळेही तुला समाधानी आणि शांत वाटेल. वैवाहिक आयुष्याचा आत्ता विचार करू नको. सद्य परिस्थितीतून बाहेर येण्याचा प्रयत्न कर. नेमकं काय आणि कुठे चुकतंय हे कळलं की तुला तुझा मार्ग नक्की सापडेल.

**ॲप वर्ल्ड**

## व्हिडिओचा दर्जा सुधारण्यासाठी...

आपल्या व्हिडिओचा दर्जा सुधारायचा असेल तर काही उपयुक्त ॲप्स डाउनलोड करून घ्यावी लागतील. 'फिल्मोरा व्हिडिओ एडिटर' डेस्कटॉप, विंडोज आणि मॅक अशा तिन्हींवर काम करेल. अँड्रॉइड युजर्स 'पॉवर डायरेक्टर'चा वापर करू शकतात. सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर करायचा असेल तर 'व्हिडिओ शॉप' हे ॲप डाउनलोड करून घ्या. अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्ससाठी हे ॲप तयार करण्यात आलं आहे.



# असं असावं '१० ईयर चॅलेंज'



**करीअर ग्रोथ**

सोशल मीडियावर बरीच चॅलेंजेस दिली जातात. मध्यंतरी 'टेन ईयर चॅलेंज'बरंच गाजलं होतं. या संकल्पनेत थोडा बदल करून तुम्ही करीअरच्या दृष्टीने याचा विचार करू शकता. म्हणजे आजपासून दहा वर्षांनी तुम्ही करीअरच्या कोणत्या टप्प्यावर असाल याचं आकलन करायचं. करीअरच्या दृष्टीने स्वत:लाच दहा वर्षांचं म्हणजे 'टेन ईयर चॅलेंज' कसं द्यायचं याबाबतच्या काही टिप्स...

✻ ध्येय ठरवणं सर्वात महत्त्वाचं. कोणत्याही ध्येयाशिवाय घेतलेल्या निर्णयांना काहीही अर्थ नसतो. मात्र ध्येय ठरलेलं असेल तर तुम्ही प्रत्येक निर्णय त्याच्याशी जोखून घेऊ शकता.

✻ स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करा. आजपासून दहा वर्षांनी तुम्हाला तुमच्यात अपेक्षित असलेल्या बदलांची यादी करा. शांतता, सुख, समाधान हवं असेल तर दगदग, धावपळ यापासून तुम्ही लांब रहाल.

✻ दहा वर्षांनंतरच्या नोकरीच्या स्थानाचा विचार करा. तुम्हाला स्वत:ला कोणत्या पदावर बघायला आवडेल, हे ठरवून ठेवा. त्या दृष्टीने प्रयत्न करा.

✻ आर्थिक सुबत्तेचा विचार प्रत्येकाच्या मनात असतो. आपल्याला कसं आयुष्य जगायचं आहे, कोणती भौतिक सुखं हवी आहेत, किती संपत्ती असायला हवी याचा विचार करा. त्यानुसार करीअरमध्ये पुढे जायला हवं. करीअरमधलं यश आणि तुम्हाला हवी असलेली भौतिक सुखं यांच्यात समतोल साधला गेला नाही तर तुम्ही स्वत:च्या क्षमतेत वाढवा. किंवा अपेक्षा कमी करा.

# कर्नाटकमधली थंड हवेची ठिकाणं

**भटकंती**

कर्नाटक हे विविधतेने नटलेलं राज्य. एकीकडे अत्यंत सुंदर समुद्रकिनारे तर दुसरीकडे टुमदार थंड हवेची ठिकाणं इथे पहायला मिळतात. उन्हाळ्यात थंड हवेच्या ठिकाणी आल्हाददायक वाटतं. कर्नाटकमधल्या अशाच काही थंड हवेच्या ठिकाणांची ही ओळख...

✻ चंद्रद्रोण पर्वतरांगांमध्ये वसलेलं केमानागुंडी खूपच मनमोहक आहे. इथल्या पाण्यातल्या औषधी गुणधर्मांमुळे त्वचाविकार बरे होत असल्याचं म्हटलं जातं. हेबे आणि कल्हाटागिरी धबधबा, राजभवन आणि भद्रा व्याघ्र प्रकल्प ही इथली काही खास आकर्षणं आहेत.

✻ पश्चिम घाटातल्या कुर्गच्या सौंदर्याचं वर्णन शब्दांमध्ये करता येणार नाही. निसर्गसौंदर्यामुळे कुर्गला भारताचं स्कॉटलंड असं म्हटलं जातं. इथे ट्रेकिंग आणि कॅम्पिंगही करता येतं.

✻ समुद्रसपाटीपासून ३४०० फूट उंचीवरचं चिकमगलूरही थंड हवेचं ठिकाण आहे. आल्हाददायक वातावरण, घनदाट जंगलं आणि उंचच उंच पर्वतरांगा आपलं मन मोहवून टाकतात.

✻ बिलिगिरीरंगा हिल्स हे सुद्धा अनोखं ठिकाणं आहे. इथे पूर्व आणि पश्चिम घाट एकमेकांना मिळतात. इथे अभयारण्यही आहे. इथून कावेरी आणि कपिला या दोन नद्या वाहत असल्यामुळे पर्यटक रिव्हर राफ्टिंग, मासेमारी तसंच बोटिंगचा आनंद घेऊ शकतात.

✻ अगुंबेला दक्षिणेचं चेरापुंजी असं म्हटलं जातं. इथेही काही काळ निवांत घालवता येईल. अगुंबेला मालगुडी डेजचं चित्रिकरण पार पडलं होतं.

